नागपूर महानगरपालिकेच्या दि.20.11.2017 सोमवार रोजी दुपारी 12.45 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 8. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 9. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 10. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 11. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 12. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 13. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 14. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 15. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 16. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 17. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 18. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 19. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 20. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 21. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 22. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 23. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 24. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 25. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 26. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 27. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 28. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 29. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 30. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 31. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 32. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 33. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 34. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 35. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 36. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 37. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 38. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 39. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 40. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 41. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 42. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 43. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 44. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 45. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 46. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 47. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 48. | 14 | अ | शिल्पा ईशांत धोटे | सदस्या |
| 49. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 50. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 51. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 52. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 53. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 54. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 55. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 56. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 57. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 58. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 59. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 60. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 61. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 62. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 63. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 64. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 65. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 66. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 67. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 68. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 69. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 70. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 71. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 72. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 73. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 74. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 75. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 76. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 77. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 78. | 23 | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 79. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 80. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 81. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 82. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 83. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 84. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 85. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 86. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 87. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 88. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 89. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 90. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 91. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 92. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 93. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 94. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 95. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 96. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 97. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 98. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 99. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 100. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 101. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 102. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 103. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 104. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 105. | 30 | अ | नागेश गोविदराव सहारे | सदस्य |
| 106. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 107. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 108. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 109. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 110. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 111. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 112. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 113. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 114. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 115. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 116. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 117. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 118. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 119. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 120. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 121. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 122. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 123. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| **124.** | 35 | अ | संदिप रमेश गवई | सदस्य |
| 125. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 126. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 127. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 128. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 129. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 130. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 131. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 132. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 133. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 134. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 135. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 136. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| 137. | मानद सदस्य | | मा.श्री. अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| 138. | मानद सदस्य | | मा.श्री.पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| 139. | मानद सदस्य | | मा.श्री.गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| 140. | मानद सदस्य | | मा.श्री.किशोर दामोदरराव जिचकार | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 2. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 3. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 4. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 5. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 7. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 8. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 9. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 11. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 12. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 13. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 14. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 15. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 16. | मानद सदस्य | | मा.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त

श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौरः— सर्वांचे स्वागत आहे. सभेची कार्यवाही सुरू करण्यात येते.

**ठराव क्रमांक 154** :— मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

**देवेंद्र फडणवीस**

कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्व. माणिकलाल गांधी स्मृत्यर्थ दिला जाणारा विदर्भ गौरव पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**महापौर नंदा जिचकार (रेक्सकॉम सदस्यपदी)**

गेल्या दहा वर्षापासून नागपूर इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ लोकल एनव्हायरन्मेंटल इनिशिएटिव्ह (आयसीईएलआय) सदस्य असून आयसीईएलई दक्षिण आशियासोबत (साऊथ एशिया) नविनिकरण उर्जा आणि संसाधन कार्यक्षमता प्रकल्पांमध्ये कार्यरत आहे.

रेक्सकॉम (REXcom) दक्षिण आशिया मध्ये आयसीईएलआयचे प्रादेशिक प्रतिनिधित्व करते. दक्षिण आशियातील सर्व आयसीईएलआय सदस्यांनी संस्थेसाठी मार्गदर्शक शक्ती म्हणून काम करण्यासाठी आणि कृतीचा अग्रक्रम ठरविण्यासाठी मतदान केले आहे. त्या अनुषंगाने नागपूरच्या महापौर श्रीमती नंदा जिचकार या इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ लोकल एनव्हायरन्मेंटल इनिशिएटिव्ह (साऊथ एशिया) च्या विभागीय कार्यकारी समितीवर सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**सुनिल गावस्कर**

पद्मगंधा प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा नलिनी बाळकृष्ण देवपुजारी पुरस्कृत जीवन गौरव पुरस्कार विख्यात क्रिकेटपटू सुनिल गावस्कर यांना जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## डॉ. दत्ता भगत

मारवाडी फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार ज्येष्ठ नाटककार, साहित्यिक, विचारवंत डॉ. दत्ता भगत यांना जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेच्या उपायुक्त या पदावर आज श्री.राजेश मनोहर मोहिते, मुख्याधिकारी नगरपरिषद वर्ग—1 हे आज उपायुक्त या पदावर रुजु झाले आहे आणि मी त्यांना विनंती करतो त्यांनी आपला सविस्तर परिचय या सदनात दयावा.

श्री.राजेश मोहिते (उपायुक्त) :— आदरणिय महापौर मॅडम, आदरणिय सभागृह, आदरणिय आयुक्त महोदय, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी सभागृह नेता, सर्व सदस्य गण, मंचावर उपस्थित आमचे वरीष्ठ अधिकारीगण व सर्व सहकारीगण मी राजेश मनोहर मोहिते, मुख्याधिकारी नगरपरीषद, गट 'अ' निवडश्रेणी या संवर्गातील अधिकारी आहे. येथे येण्यापुर्वी मी मा.सामाजिक न्यायमंत्री श्री.राजकुमार बडोले साहेबांकडे खाजगी सचिव म्हणुन कार्यरत होतो. मुख्याधिकारी म्हणुन मी नागपूर जिल्हा, चंद्रपुर जिल्हा, तसेच यवतमाळ जिल्हामध्ये काम केलेले आहे. उमरेड नगरपरिषद, बोराळा नगरपरिषद, बल्लारशहा नगरपरिषद, यवतमाळ नगरपरिषद, त्याचप्रमाणे मी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर, जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर या ठिकाणी सुध्दा जिल्हा अधिकारी प्रशासन प्रोजेक्ट, नगरपरिषद प्रशासन या ठिकाणी काम केलेले आहे मी मुळचा नागपूरचाच आहे त्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचे आणि नागपूर महानगरपालिकेचे मनपुर्वक धन्यवाद देतो की माझ्या गावामध्ये मला सेवेचे संधी मिळाली आणि मी पॉझीटीव्ह ॲटयीटयुड ठेवुन पुर्ण निष्ठा ठेवुन काम करण्याचा पुर्ण प्रयत्न करेल, धन्यवाद.

श्रीमती दिव्याताई धुरडे :— मा.महापौरजी, आज आपल्या नगरसेविका सौ.सरलाताई नायक यांचा वाढदिवस आहे मी त्यांना वाढदिवसांच्या खुप खुप शुभेच्छा देते आणि सभागृहाला देखील विनंती करते की त्यांचे देखील अभिनंदन व्हावे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, मी एक विषय टाकलेला होता कलम 44 अंतर्गत तो विषय या विषय पत्रिकेमध्ये आला नाही. मागच्या महिन्यामध्ये मी नोटीस दिलेली होती तो विषयपत्रिकेमध्ये होता मागच्या सभागृहामध्ये कामकाज झालेले नाही सभा स्थगित झाली मग नियमाप्रमाणे तो विषय या सभागृहामध्ये यायला पाहिजे होता परंतु तो ही विषय आलेला नाही. आणि मी टाकलेला विषयही आलेला नाही याचे कारण काय आहे याची माहिती मला देण्यात यावी.

महापौर :— निगम सचिवांनी या प्रश्नांचे उत्तर दयावे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, दि. 16/10/2017 च्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र 108 हा सर्व संम्मतीने घेण्यात आला हा ठराव असा होता की म.न.पा. अधिनियमातील कलम 30(2) अन्वये तसेच प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करणे महानगरपालिका कामकाज नियमातील कलम 1 जे अन्वये संबंधित विशेष समितीकडे अग्रेषित करण्यात यावे समितीने नोटीस सादर करणाऱ्या मा.सदस्यांचे म्हणणे ऐकुन घेवून गरज असल्यास मनपा सभागृहात महानगरपालिकेची ही सभा मंजुरी प्रदान करते या ठरावाचे सुचक होते मा.सत्तापक्षनेता अनुमोदक होते मा.विपक्षनेता आणि मा.गटनेता, बहुजन समाज पक्ष यांनी अशाप्रकारे हा ठराव या सदनात दाखल केला आणि त्याला एकमताने मंजुरी प्रदान करण्यात आली आणि मागच्या सभेकरिता आपल्याला एकुण 13 नोटीसेस प्राप्त झाल्या आणि ज्या ठरावाच्या आधारावर असा निर्णय घेण्यात आला की हे सर्व प्राप्त झालेल्या नोटीस आहे.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर मा.सदस्य श्री.संदीप सहारे यांचा प्रश्न असा होता की त्यांची जी नोटीस होती ती कायदयाच्या कुठल्या कलमान्वये होती.

निगम सचिव :— मा.महापौरजी, त्यांनी जी नोटीस दिली होती ती महाराष्ट्र महानगरपालिका कामकाजातील कलम 1 (जे) अंतर्गत त्यांची नोटीस होती.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, कलम 44 चा प्रश्न मागच्या सभागृहात आला होती आणि आणि प्रश्नाबरोबर नोटीस पण होती. आणि नियमाप्रमाणे ते मागच्या सभागृहात आली होती मग तो प्रश्न या सभागृहात का आला नाही.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, मा.सदस्यांचा प्रश्न असा आहे की ज्यांनी प्रश्न उपस्थित केला होता तो प्रश्न आपण या सभागृहाच्या विषय पत्रिकेवर का घेतला नाही. आणि आपण ज्या ठरावाचे वाचन केले त्या ठरावाचा संदर्भ जो आहे तो कलम 1 (जे) च्या नोटीसच्या संदर्भात आहे त्यामुळे कलम 44 अंतर्गतचा प्रश्न आपण विषय पत्रिकेवर न घेण्यामागचे कारण काय? आपण सभागृहात पटवून सांगावे.

निगम सचिव : — मा.महापौरजी, म.न.पा. अधिनियमातील कलम 44 अंतर्गत आपल्याला 10 प्रश्न सभेमध्ये चर्चेकरिता घ्यायचे आहे या अनुषंगाने मागच्या सभेतील 6 प्रश्न हे अनुउत्तरीत राहीले म्हणुन ते 6 प्रश्न अजेंडयावर घेतलेले आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी माझा पहिला प्रश्न होता मी टाकलेला होता आणि त्यावेळेसे बाकीच्या लोकांचे प्रश्न यायचे होते फक्त प्रफुलजी गुडधे यांचा एक प्रश्न आलेला होता तोही 1 तारखेला श्री.प्रफुल गुडधे पाटील यांचा प्रश्न आल्यानंतर माझा प्रश्न का आला नाही.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, सन्मानणिय निगम सचिवांनी जे उत्तर दिले ते बरोबर नाही. संदीप सहारे यांचा प्रश्न किती तारखेला आला होता.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन, मला फक्त एकच विचारायचे आहे की एका नगरसेवकांचा फक्त एकच प्रश्न घ्यायचा आहे काय या संदर्भात आपण काही ठरविले आहे काय?

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, मुळ प्रश्न असा आहे की मागील सभेतील जे स्थगित प्रश्न आहे ते वगळता आपण 10 प्रश्न घेतले पाहिजे त्याचे इंटरप्रिटेशन करीत असतांना सन्माननिय निगम सचिव चुकीच्या पध्दतीने त्याचे इंटरप्रिटेशन करीत आहे मागच्या सभेमध्ये समजा एकाच आणि अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर जर आपण पुर्ण 1 तास दिला आणि सभागृहाची तशी भावना झाली आणि समजा 1 तास त्या प्रश्नावर दिला आणि 9 प्रश्न अनुत्तरीत राहीले. या सभेमध्ये या ठिकाणी सन्माननिय निगम सचिवांनी जे उत्तर दिले जरी 10 घ्यायचे होते तरी यांचा प्रश्न या 10 मध्ये येत आहे कारण ज्या दिवशी मी प्रश्न उपस्थित केला त्याच दिवशी सन्माननिय श्री.संदीप सहारे यांनी प्रश्न उपस्थित केला असे त्यांचे म्हणणे आहे ते खरे आहे काय? जर ते खरे असेल तर त्यांचा प्रश्न क्र.2 वर तो प्रश्न असायला पाहिजे होता मात्र त्यांचा प्रश्न सभागृहाच्या विषयपत्रिकेमध्ये आपण तो अंतर्भुत केला नाही त्याचावर त्यांचा आक्षेप आहे त्यांच्यावर त्यांनी स्पष्टीकरण दयावे.

श्री.निगम सचिव :— मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मध्ये क्र 4 मध्ये प्रश्नांच्या संदर्भात स्पष्ट लिहीले आहे की पिठासीन अधिका—यांचा सहविवेकानुसार एका सर्वसाधारण सभेमध्ये जास्तीतजास्त 10 प्रश्न चर्चेकरिता घेण्यात येतील परंतु यापेक्षा एक तासापर्यत जास्त प्रश्न असल्यास प्रश्नाचे लेखी उत्तर देखील त्या सदस्यांना देण्यात येईल याचा अर्थ आहे की आपल्याला 10 प्रश्न आपल्याला चर्चेकरिता घ्यायचे आहे आणि मागच्या सभेचे 6 प्रश्न स्थगित असल्यामुळे ते प्रश्न आम्ही या विषयपत्रिकेवर घेतलेले आहे उरलेले 4 प्रश्न यामध्ये 2 प्रश्न भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी दिलेले आहे. एक प्रश्न मा.सदस्या आभा पांडे यांचा आहे आणि उरला एक प्रश्न त्यानुसार आम्ही मा.सदस्य प्रफुल्ल गुडधे यांचा 1 तारखेला आलेला पहिल्या क्रमांकाचा प्रश्न होता तो आम्ही येथे घेतला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, दुसरा प्रश्न किती तारखेला आला होता. आणि मा.महापौरजी यांनी हा प्रश्न नाकारला असेल तर मा.महापौरजी यांची नोट त्या फाईलवर लिहीलेली आहे त्याचे वाचन या ठिकाणी करण्यात यावे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.संदीप सहारे यांचा प्रश्न आपल्याला 1 तारखेलाच प्राप्त झाला आहे परंतु दुपार नंतर झालेला आहे आपला प्रश्न पहिले आला होता.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, 1 तारखेला समजा 4 प्रश्न आले तर 4 प्रश्न आपण अंतर्भुत करतो की सभेचा अजेंडा निघण्याच्या आधी निश्चीत करतो की कुठले प्रश्न सिलेक्ट केले पाहिजे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, जेव्हा आम्ही अजेंडा सेट करतो त्यावेळी निश्चित करतो की आपल्याला किती प्रश्न घ्यायचे आहे जर हे 6 प्रश्न स्थगित राहले नसते तर आपल्याला जे 10 प्रश्न प्राप्त झाले आहे ते प्रश्न आपण विषय पत्रिकेवर घेतले असते.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, या ठिकाणी एकंदर 4 प्रश्न घेतले यामध्ये किती प्रश्न आले होते ?

निगम सचिव :— मा.महापौरजी, या सभेकरिता आपल्याला एकुण 9 प्रश्न आले होते. त्यातील 4 सिलेक्ट झाले उरलेले 5 प्रश्नांचे उत्तर प्रशासनाने दिलेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, उरलेले 5 प्रश्न नाकारन्याचा अधिकार हा कुणाचा आहे.

निगम सचिव :— मा.महापौरजी, प्रश्न नाकारले नाही त्याचे उत्तर मा.आयुक्तांनी दिलेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, विषय पत्रिकेमध्ये ते अंतर्भुत करण्याचा अधिकार हा कुणाचा आहे.

श्री.प्रविण दटके :—मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, एखादया सदस्यांनी प्रश्न विचारला तो प्रश्न सभागृहात पाठवायचा की नाही पाठवायचा या संबंधीचा अधिकार कुणाकडे आहे या संदर्भातील माहिती दयावी.

निगम सचिव :— मा.महापौरजी, प्रश्न सभागृहात पाठवायचा की नाही पाठवायचा तो अधिकार मा.महापौरजी यांचा आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, हे एकदम बरोबर आहे हा अधिकार मा.महापौरांना आहे मात्र हा प्रश्न विषय पत्रिकेत घेवु नये या प्रकारचा निर्णय आम्हाला कशाप्रकारे कळविला त्या संदर्भात फाईल मध्ये काय नोटींग आहे. नाकारला आहे काय मा.महापौरांनी?

निगम सचिव :— मा.महापौरजी, प्रश्न नाकारलेला नाही.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, या विषयपत्रिकेवर या 9 पैकी फक्त 4 प्रश्नच घेण्यात आले, 5 प्रश्न घेण्यात आले नाही याचा निर्णय कुठल्या आदेशान्वये झालेला आहे.

श्री.सुनिल अग्रवाल :— पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.महापौरजी, जितने प्रश्न आते है पिछले महापौरजी के संयुक्त बैठक मे विपक्ष नेता और सत्तापक्ष के नेता मे ऐसा तय हुआ था की हर एक पार्टी का उसमे परसेंटेज फिक्स किया जायें उस परसेंटेज के हिसाब से लिये जाये । उसतरह से लिये गये की नही लिये गये।

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.सदस्य सुनिल अग्रवाल यांनी जे येथे म्हटले आहे त्या रेशीयो नुसार घ्यावा असा काही कागद आहे काय?

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, हा जो सर्व पक्षीय समितीचा जो निर्णय आहे तो सभागृहामध्ये ठेवायला पाहिजे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.महापौर श्री.अनिल सोले असतांना सभागृहाचा नेता म्हणुन मी आणि विरोधी पक्ष नेता म्हणुन श्री.विकास ठाकरे होते, सर्व गटनेते होते, तेव्हा अनेक गट होते आता 3 ते 4 राहिले आहे तेव्हा 5 ते 6 गट होते तेव्हा ती बैठक सचिवांकडे झाली होती. मी स्वतः त्या बैठकीत होतो त्याचे व्हीडीयो रेकॉर्डींग पण झाले होते आणि हे प्रश्न कसे घ्यायचे, काय घ्यायचे तेव्हा हे घेतांना चिठया टाकायच्या त्याचे रेकॉर्डींग झाले पाहिजे ही सर्व स्थिती ठरली होती ते असेल तर ते सभागृहाला दयावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, 5 मिनीटामध्ये मी हा विषय कनक्लुड करतो. मुळ मुद्या असा आहे की सदस्यांना प्रश्न विचारायचा या शहरातील प्रश्नांच्या संदर्भामध्ये दाद मागण्याचा व प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि म्हणुन कलम 44 अंतर्गत प्रश्न विचारायचे आहे आणि कलम 1 (ज) अन्वये त्याला नोटीस दयायची आहे. नोटीसचा ज्यावेळेस वापर सुरु झाला तेव्हा सन्माननिय अनिलजी सोले या सभागृहाचे सत्तापक्ष नेते होते आणि त्या नोटीसचा दुरुपयोग होत होता त्यावेळेस या सभागृहामध्ये ठराव झाला होता की अशा पध्दतीने प्रशासकीय बाबी आपण या नोटीसीव्दारे कुठल्याही सदस्यांनी आणु नये त्यांनी स्वतःच्या पक्षांच्या सदस्यांना सुध्दा सांगितले होते म्हणुन मा.महापौरजी, अशा नोटीसेस व्दारे प्रश्न उपस्थित करण्याची मुभा सभागृहातील प्रत्येक सदस्यांना आहे. हे सभागृह दिवसेंदिवस प्रगल्भ होत आहे अगदी नविन निवडुन आलेले सदस्य सुध्दा या कलमांचा वापर करुन शहरातील अनेक महत्वाचे प्रश्नांचा वापर या सभागृहात करीत आहे आणि हे फक्त ते कॉग्रेस पक्षांचेच नगरसेवक याचा उपयोग करीत आहे असे नाही, अनेक नवनिर्वाचित सदस्यांचे मी मनपुर्वक अभिनंदन करतो की पहिल्याच टर्ममध्ये त्यांनी अत्यंत महत्वाच्या आणि ज्वलंत प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी या कलमांचा वापर केला आहे मा.महापौरजी, मागच्या सभागृहामध्ये ज्या ठरावांचे वाचन आपण करीत आहे कलम 30(2) अन्वये मा.महापौरजी, हे सभागृहातील सर्व सामान्य सदस्यांच्या अधिकारांचे हनन आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, मागच्या सभागृतील नोटीसचा अजेंडा असेल तर तो वाचुन दाखवावा ते सभागृह ठरवेल की कुठला प्रश्न अति महत्वाचा होता आणि कुठला नव्हता माझी आपल्याला विनंती आहे सचिवांनी ते वाचुन दाखवावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मी वाचुन दाखवितो.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, ते सचिव नाही त्यामुळे सचिवांनी ते वाचुन दाखवावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी हे नगरसेवकांच्या अधिकारांचे हनन आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, हे कोणत्याही नगरसेवकांच्या अधिकारांचे हनन नाही आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, या ठिकाणी प्रश्न महत्वाचा नसेल तर हा निर्णय सभागृहाला घेण्याचा निश्चितपणाने अधिकार आहे आणि तो प्रश्न या विषयपत्रिकेवर आल्यानंतर कलम 30(2) अन्वये या सभागृहाने तो निर्णय घ्यावा.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर तो ठराव झाला तो एकदम नियमासंगत आहे तो नियमासंगत आहे की नाही मा.सचिव येथे आहे त्यांनी या सभागृहामध्ये ठरावांचे वाचन केले.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी माझा या ठिकाणी सबमीशन असे आहे सन्माननिय दटके साहेबांनी येथे एकदम आवेशात येण्याची काही आवश्यकता नाही आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, आवेशाचा हा प्रश्न नाही नगरसेवकांच्या अधिकारांचे हनन झाले हे गेल्या 7 दिवसांपासुन सर्व वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, जिस संदर्भ मे सभागृह मे चर्चा हो रही है इसलिये सभागृह मे निर्णय लेने के लिये बाधित होना पडा की पिछली सभागृह मे किस प्रकार के प्रश्न आयेंगे वह अप्रासंगिक भी प्रश्न थे इसलिये केवल संदीपजी जोशी ने निर्णय लिया ऐसा नही महानगरपालिका का सत्तापक्ष नेता जो सत्तापक्ष का प्रतिनिधीत्व करते है, महानगरपालिका का विरोधी पक्ष नेता जो विरोधी पक्ष का प्रतिनिधी है साथ ही साथ मे बी.एस.पी. का नेता वह अपने गट के प्रतिनिधी है ऐसे 3 प्रमुख गट के तिन प्रमुख नेता ने मिलकर के संयुक्त हस्ताक्षर से निवेदन दिया है।

श्री.तानाजी वनवे :– पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, दयाशंकरजी ने जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आणि ते सांगत आहे की सर्व संमत्तीने हे झालेले आहे. हे सर्व संम्मतीने झालेले नाही. तो प्रस्ताव घाईगर्दीमध्ये हस्ताक्षर चुकुन केलेले होते तसे पत्र मी सभागृहाला दिले. हा मुद्या आपण चर्चेला घ्यावा. आपल्या नगरसेवकांचे जे अधिकार आहे त्याचे हनन होवु नये केवळ हुकुमशाही पध्दतीने कोणतेही काम होवु नये लोकशाही पध्दतीने व्हावे म्हणुन या ठरावावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, या ठिकाणी ठराव क्र. 108 मध्ये कलम 30(2) अन्वये जो ठराव केलेला आहे त्याच्या ऑपरेटीव्ह पार्टवर आमचा आक्षेप आहे. त्यावर आक्षेप असा आहे विषय पत्रिकेमध्ये आपण हा विषय संपुर्ण अंतर्भुत करावा आणि सभागृहाला वाटले तर तो विषय तेवढा महत्वाचा नाही तर समितीच्या माध्यमातुन त्याला न्याय देता येवु शकेल तर मात्र आपण समितीकडे वर्ग करावा मात्र सर्वप्रथम हा विषय विषयपत्रिकेवर आणण्याचा जो सदस्यांचा जो अधिकार आहे तो संरक्षित करायला पाहिजे मा.महापौरजी, याचा ऑपरेटीव्ह पार्ट प्रशासनाने मिस इंटरप्रियेट केला आहे हे आमचे सबमिशन आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, मिस इंटरप्रिटेशन काय केले ते योग्य आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार या सभागृहाला आहे कुणा एका सदस्यांना नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, मी काही सभागृहावर कंम्पलशन आणुन राहिलो नाही. मी बोलत असतांना माझे सबमिशन आहे असे म्हटले मा.महापौरजी, ज्या तावामध्ये सन्माननिय सदस्य बोलुन राहिले आहे. तो माझा स्वभाव नाही मा.महापौरजी, मात्र आपली बाजु खोट बोलायच आणि रेटुन बोलायचे ही जर पध्दती सन्माननिय सदस्यांची असेल तर मला असे वाटते ती चुकीचे आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर या सभागृहात जी काही नोंद होते ती नोंद करीत असतांना हा अग्रेसीव्ह बोलला, हा गोड बोलला, हा हसुन बोलला, हा मुस्कुराहुन बोलला, असे लिहील्या जाते काय मा.महापौरजी

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय दटके साहेबांनी जो उल्लेख केला त्याचे इंटरप्रिटेशन तुम्ही एकटे कसे ठरवु शकतात ते मी ठरवित नाही, माझे सबमिशन आहे मी इंटरप्रिटेशनला इंम्पोज करीत नाही माझ्या इंटरप्रिटेशनचे सबमिशन सभागृहापुढे ठेवले आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, या नोटीसच्या प्रश्नासंदर्भात मा.सदस्यांच्या ज्या हरकती आहे त्या संदर्भात आपण जो सभागृहामध्ये ठराव घेतला आहे परंतु सर्व सदस्यांच्या अधिकारांचे हनन होत आहे आणि वर्तमानपत्रामध्ये त्या संबंधामध्ये अनेक वेळा लिहीलेले आहे त्यामुळे आपल्याला आम्ही सर्व विरोधी पक्षांचे नेतेमंडळीने आपल्याशी चर्चा केलेली आहे आणि त्यानुसार आपण हा जो प्रस्ताव आहे हा नामंजूर करुन आपण याच्यामध्ये नगरसेवकांचे अधिकार आपण कायदयानुसार त्यांना बहाल करावे, अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, यानंतर सभागृह चालवत असतांना सभागृहात विरोधी पक्षनेता तानाजी वनवे यांना समजायचे की नाही विरोधी नेत्यांच्या मंडळींनी म्हणजे विरोधी पक्षनेता कोण? सभागृहात नेत्या मंडळींच्या म्हणण्यानुसार निर्णय घ्यायचा असेल तर विरोधी पक्षनेता नेमला कशासाठी? आपण पहिले हे निश्चीत करावे की विरोधी पक्षनेता कोण आहे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, मी जरी विरोधी पक्षांचा नेता असलो तरी सन्माननिय सदस्यांना आपली भावना मांडण्याचा अधिकार सभागृहामध्ये आहे त्यामुळे त्याचे इंटरप्रिटेशन आपण कृपया करु नये.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, सन्माननिय विरोधी पक्ष नेत्यांनी कागदावर वाचुन हस्ताक्षर करुन आपली भावना लेखी व्यक्त केली आहे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, तो जो कागद दिला होता तो चिटोरा होता.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, या प्रस्तावाला ते चिटोरा म्हणत आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी वाचुन सही केली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, त्याच्या ऑपरेटीव्ह पार्टवर आम्ही आक्षेप घेतला आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, माझा एक लहानसा प्रश्न आहे की जर नगरसेवक शहरातील समस्येसंदर्भात प्रश्न देत असतील तर काही वाईट होत आहे काय ? मा.महापौरजी, आपणांस विनंती आहे सदस्य काही आपल्या घरचे प्रश्न मांडीत नाही त्यामुळे जी प्रथा पुर्वीपासुन सुरु होती नगरसेवकांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता पुन्हा मुभा दयावी. सभागृहामध्ये विकास ठाकरे यांचा उल्लेख केला या सभागृहामध्ये सकाळी 10 वाजेपासुन अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झाली की आम्ही दुस—या दिवशी सकाळी 10 वाजता निघायचो तर लोक ब्रश करतांना दिसायचे इतकी लांब चर्चा या सभागृहात झालेली आहे आणि जर नगरसेवक प्रश्न मांडीत असतील आणि प्रशासन त्याला उत्तर देत असतील आणि चर्चेमधुन जर प्रश्न सुटत असतील तर नगरसेवकांना प्रश्न मांडण्यासाठी विरोध का ? मा.सदस्यांचे प्रश्न घ्यायलाच पाहिजे अशा मताचा मी आहे. त्या दिवशी सभागृहात चेंगळ झाली होती

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या प्रश्नामध्ये जी संग्धिग्धता निर्माण झाली आणि येथे नगरसेवकांचे अधिकारांचे हनन होत आहे. मला असे वाटते की या संदर्भामध्ये सर्वपक्षीय समिती करुन या ठरावाचा अभ्यास महानगरपालिकेतील कामकाज नियमावलीचा अभ्यास करुन प्रश्न उपस्थित करण्याची जी पध्दती आहे त्यामध्ये सभागृहातील सदस्यांच्या भावना असेल त्या संदर्भामध्ये सर्वपक्षिय समिती तयार करुन 1 महिन्यांच्या आत रिपोर्ट या सभागृहामध्ये निर्देश देण्याची सुचना मा.महापौरजी मी या ठिकाणी करतो याचा अभ्यास करण्यात यावा, आणि हा ऑपरेटीव्ह पार्ट चुकीच्या पध्दतीने जो येथे ठेवला आहे त्याला कसे करेक्ट करता येईल या संदर्भामध्ये आपण सर्वपक्षीय समितीची स्थापना आपण करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, 365 दिवसांच्या मध्ये 12 मिटींग आपल्या होतात त्यामध्ये जर आपण सदस्यांना वेळ देत नसु तो कोणत्याही पक्षाचा नगरसेवक राहो नगरसेवकांना बोलायचा अधिकार त्यांना दिला पाहिजे 30 दिवसांमध्ये 1 सभा चालते ती सभा चालली तर फरक पडणार नाही. आमदनी कशी वाढेल याच्यावरही चर्चा व्हायला पाहिजे, आमदनी येईल तर विकास कामे होईल आपण सरकारच्या भरवश्यावर किती दिवस जगणार आहोत माझी आपणांस एक विनंती आहे ज्या ज्या सदस्यांनी सभेमध्ये प्रश्न केला त्याला बोलण्याचा अधिकार आपण बहाल केला पाहिजे. शासनाने तो बहाल केला आहे आणि त्या संदर्भात शासनाचे परिपत्रक आहे म्हणुन आपणांस माझी विनंती आहे बोलण्याची मुभा सदस्यांना देण्यात यावी.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, मागच्या सभागृहामध्ये या पध्दतीचा ठराव सभागृहाने मंजुर केला. आता हा ठराव या पध्दतीने मंजुर करण्याचे कारणे काय ? ठराव नेहमी समोर ठेवला जातो त्याचे वाचन होते मग त्यात चेंगळ तुम्ही करीत असाल त्याला आम्ही जबाबदार नाही चेंगळ बंद करा. त्या ठिकाणी सचिव ठराव वाचत असतांना सभागृहामध्ये परमपुज्य बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकांसाठी बसपा जर जोर लावत असेल तर सहारेंजी तुम्ही त्याला चेंगळ म्हणता, त्यांच्या भावनेला तुम्ही चेंगळ म्हणुन भलतीकडे घेवुन जात आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, मी आपणांस सांगतो की हा विषय आणला होता मनोज सांगोळेजी यांनी ते कॉग्रेस पक्षांचे नगरसेवक आहे आणि कॉग्रेस पक्षालाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी स्मारक व्हावा ही इच्छा होती त्यामध्ये भारतीय जनता पार्टी यांनी ते क्रेडीट कॉग्रेस पक्षाला मिळु नये म्हणुन प्रयत्न करीत आहे.

श्री.मोहम्मद जमाल :— मा.महापौरजी, पिछले सभागृह मे सन्माननिय सदस्य श्री.संदीप सहारेजींने चेंगळ का

नाम दिया है। यह विषय ऐसा था जो लगातार सदन के अंदर आ रहा था और वह विषय समाज से इतना गंभीरता पुर्वक जुडा हुआ है उसको उसके पहले हम लोगो ने लिया हुआ था उसके पहले कई बार कई लोगो ने लिया। हमारा बोलना यह था कॉग्रेसने यह सदन मे लाकर मंजुर किया और अपने कार्यकाल मे उसे पुर्ण नही किया उसके बाद पिछले 10 सालो से भारतीय जनता पार्टी का सत्ता यहा पर होने के बाद भी उस विषय को गंभीरता पुर्वक ना लेकर सिर्फ सदन के अंदर विषय को रखकर इसको चिल्लर रुप दिया जा रहा है। इसलिये उस दिन हमने निर्णय लिया जब तक इस विषय के उपर फायनल डिसीजन नही होता तब तक हाउस चलने नही देंगे और इसको मा.सदस्य चेंगळ का नाम देते है इस मामले मे बहोत अफसोस जाहीर करता हुँ इस संदर्भ मे हमारी मा.मुख्यमंत्रीजी से चर्चा हुई और मा.मुख्यमंत्रीजींने हमे आश्वस्त किया की उस स्मारक का काम हम शुरु कर देंगे क्यौकी परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर से जुडा हुआ विषय है और इसको चेंगळ का रुप दिया है उसका मै विरोध करुंगा

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, तो विषय चर्चेच्या माध्यमातुनही निघु शकत होता तशी मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांची तिव्र इच्छा होती. (बेल)

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, जो ठराव आपण या ठिकाणी केला तो ठराव करण्याच्या मागची कारणे देखील आहे. आता ही गोष्ट वेगळी की भारतीय जनता पार्टीची सत्ता आली की गल्ली पासुन दिल्ली पर्यत कुठेतरी तानाशाही बोलल्या जाते, कुठेतरी हुकुमशाही बोलल्या जाते, कुठेतरी नगरसेवकांच्या अधिकारांचे हनन असे बोलल्या जाते परंतु तो ठराव करण्याच्या कारणांपैकी एक कारण असे होते की जे ठराव येतात आहे ते ठराव नागपूर महानगरपालिकेच्या संबंधात सुध्दा नसणारे ठराव येत आहे. उदा. एक ठराव असा होता की मेट्रोचा अपघात झाला तर आता मेट्रोचा अपघात त्या ठिकाणी झाला तर मेट्रोच्या अपघाताशी मेट्रोशी संबंधित विषय होता. हा काही महानगरपालिकेशी संबंधित विषय नव्हता. त्या विषयांशी भावना असणे स्वाभाविक आहे त्यामुळे चर्चा करुन आपल्याच कक्षात मा.विरोधी पक्षनेते, मा.बसपा नेते आल्यानंतर त्यांच्याशी बोलुन त्यांच्या समोर त्यांना दाखवुन, त्यावर पहीली स्वाक्षरी माझी करुन त्यानंतर मा.विरोधी पक्षनेता आणि बसपा नेता यांची आपण त्यावर स्वाक्षरी घेतली आता कुठलीही गोष्टी विनावाचता कोणी करीत असेल असे मला तरी वाटत नाही त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर त्यांच्या समोर कागद ठेवल्यानंतर ते वाचुनच त्यांची स्वाक्षरी त्या ठिकाणी घेण्यात आली. कुठेही कुठल्या पध्दतीने जबरदस्ती म्हणजे मा.तानाजी वनवे सारख्या नेत्यांवर जर जबरदस्ती करण्याची ताकद माझी नाहीच अशा पध्दतीने तो ठराव झालेला आहे आणि तो ठराव झालेला असतांना आज ज्या प्रकारच्या चर्चा या ठिकाणी होत आहे त्या खरे म्हणजे काय म्हटले आहे त्यामध्ये आपल्या कलम 30 (2) अन्वये या ठिकाणी स्पष्ट शब्दात कलम 30(2) या कलमांचे वाचन करतो की महानगरपालिकेच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीआंश पालिका सदस्यांनी मत देवुन पारीत केलेल्या विशीष्ट ठरावाव्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या प्रश्न प्रथमतः समिती पुढे ठेवण्यात यावे इतके स्पष्ट आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, प्रश्न आणि ठरावामध्ये अंतर आहे. प्रश्न कलम 44 अंतर्गत उपस्थित केला जाते आणि ठराव 1 (जे) अंतर्गत उपस्थित केला जाते. माझा आक्षेप होता या ठरावांच्या संदर्भामधील सही वर आक्षेप नव्हता. आक्षेप याच्या ऑपरेटींग पार्टवर होता. कारण ज्या प्रश्नांचा उल्लेख त्या कलमान्वये करीत आहे तो प्रश्नच नाही. आपण जे वर्ग करीत आहे ते ठराव वर्ग करीत आहोत त्यामुळे ते ठराव या सभागृहामध्ये आणावे आणि त्यानंतर ते वर्ग करावे एवढीच सुचना होती. दुसरे महत्वाचे आपण सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी जो उल्लेख केला, मेट्रोरेल्वेच्या अपघाताचा मी दुसरे उदाहरण सांगतो मा.महापौरजी, विषय क्र 4 अन्वये नोटीस प्राप्त आहे श्री.संजय बंगाले यांची आणि विषयाचा मसुदा काय आहे की ऑरेंज सिटी स्ट्रीटच्या संदर्भात यांचा विषय आहे ज्या समितीकडे आपण हा विषय वर्ग करीत आहोत त्या समितीच्या सभापती यांनी या कलमांचा वापर करुन तो प्रश्न येथे उपस्थित केला आहे मा.महापौरजी त्यांनी जर हे समितीच्या माध्यमातुन ठराव करुन जर हा ठराव रितसर पाठविला असता तर जास्त संयुक्तीक झाले असते या संदर्भात आपण निर्णय सरसकट न घेता हे पुर्णतः सभागृहामध्ये येवु दयावे आणि मग समितीकडे वर्ग करावे हीच माझी सुचना आहे मा.महापौरजी, यामध्ये कुणाचे काय म्हणणे आहे हा विषय नाही आहे. सरसकट एखादया ठरावाव्दारे पुर्ण अधिकार सिझ करणे हे संयुक्तीक होणार नाही व उचित होणार नाही ऐवढे साधे म्हणणे आमचे आहे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, जो ठराव मांडला किंवा जे नोटीस देण्यात आली त्या बद्दलचा उल्लेख

सदस्यांनी केला. आमचे म्हणणे देखील तेच आहे की एकीकडे आपल्या कायदयानुसार स्पष्ट म्हणण्यात आलेले आहे जो उल्लेख मा.प्रफुल्लजींने मघाशी केला की प्रश्न जे आहे ते प्रश्न तुम्ही समित्यांपुढे पाठवा कारण कायदयामध्ये लिहीलेले आहे की प्रश्न हे समितीपुढे पाठविले पाहिजे जर आम्हालाही कुणाच्याही नगरसेवकांच्या विशेष अधिकारांचे हनन जर करायचे असते किंवा हुकुमशाहींने सभागृह चालवायचे असते तर प्रश्न देखील पाठविले नसते कारण की कायदयामध्ये स्पष्ट लिहीलेले आहे. की प्रश्न समितीपुढे पाठविण्यात यावे हा एक विषय झाला. दुसरा विषय असा आहे की ज्या विशेष समित्या आपण बनविलेल्या आहे शेवटी त्या विशेष समितींच्या कामकाजांचे क्षेत्र देखील निश्चित करणे अत्यंत गरजेंचे आहे. त्या विशेष समित्या आपण कशासाठी बनविलेले आहे की त्यांनी नुसते बसावे, नुसते पदे घ्यावे सभापती बनावे, उपसभापती बनावे, आणि यांचे कामकाज काहीच चालावे नाही अशा पध्दतींचे असेल तर हे देखील चुकीचे आहे त्यामुळे विशेष समितीमध्ये देखील इतर सर्व बाबी या पाठवाव्या आणि इतर सर्व बाबी त्या पाठविल्या नसत्या त्या वापस पाठविण्यात याव्यात तर गरज असल्यास त्या सभागृहापुढे घेण्यात याव्यात मा.विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटले की आम्ही त्याच दिवशी सांगितले की आपल्याला आश्चर्य वाटेल की मा. विरोधी पक्ष नेत्यांनी दि.15 नोव्हेंबर ला 1 (जे) अन्वये जी नोटीस दिली ती सभापतींकडे नोटीस दिली म्हणजे एक नोटीस आपण दिली निगम सचिवांकडे नियमाप्रमाणे दिली. आणि दुसरीकडे म्हणता की चिटो–यावर सही केली.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.महापौरजी जो प्रस्ताव आपण त्या बैठकीमध्ये घेतला व त्यावर सहया घेतल्या त्यावेळी अशी चर्चा झाली होती की आपण सभागृहामध्ये चर्चा करुन तो प्रस्ताव मंजूरीला आणु परंतु चर्चा न करता आपण ते मंजूर केले आणि विशेष समित्यांकडे माझ्या पी.ए. नी निगम सचिवांकडे पत्र दिले दिल्यानंतर त्यांनी सांगितले की तुम्ही त्यांना पुन्हा पत्र दया ते पी.ए. नी पत्र दिलेले आहे. मी ते पत्र आपल्याकडेच पाठविलेले होते.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, आपण विषय संपवू या मा.विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की पी.ए. नी पत्र दिले मला पण लक्ष दयायला हवे की माझ्या पण पी.ए. नी अशाच प्रकारचे पत्र देत असतील तर त्याच्यामुळे माझी आपणाला सभागृहाच्या माध्यमातुन आपणांस विनंती आहे की सभागृहाचे जेष्ठ सदस्य आहे सन्मानानिय दयाशंकरजी तिवारी आहे, प्रविणजी दटके आहे, प्रफुल्लजी गुडधे आहे, सुनिलजी अग्रवाल आहे आणि बसपा चे एखादे नाव बसपा गटनेते श्री.जमाल यांनी सुचवावे या संदर्भात 5 सदस्यांची एक समिती तयार करावी, सभागृहातील हे सर्व जेष्ठ सदस्य आहे आपल्याला किंवा या सभागृहाला या सदस्यांचे अधिकारांचे हनन करण्याचा कुठलाही मानस नाही तो तेव्हाही नव्हता आणि आजही नाही परंतु असे जर असेल तर 5 सन्माननिय सदस्यांनी या संदर्भात बैठक घ्यावी आणि यामध्ये जे 5 सन्माननिय सदस्य यावर जो काही निर्णय घेतील हा सर्व समावेशक निर्णय राहील असे म्हणायला मा.विरोधी पक्षनेत्यांना देखील हरकत नसावी अशा पध्दतीचा निर्णय आणि निर्देश सभागृहाला दयावे आणि पुढच्या सभागृहात तो 5 सन्माननिय सदस्यांचा अहवाल सादर करण्यात यावा.

महापौर :– बहुजन समाज पार्टीच्या गटनेत्यांनी त्यांच्या पक्षातील 1 सदस्यांचे नाव सुचवावे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी कॉग्रेस पक्षातर्फे श्री.प्रफुल्ल गुडधे पाटील यांना त्या समितीमध्ये घ्यावे असे मी आपणांस सुचित करीत आहोत.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, बहुजन समाज पक्षातर्फे श्री.नरेंद्र वालदे यांना त्या समितीमध्ये घ्यावे असे मी आपणांस सुचवितो.

**<u>ठराव कमांक 136</u>**:– वरील चर्चेनंतर सभागृहातील मा.सदस्यांचा मानस लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 44 अंतर्गत उपस्थित होत असलेले प्रश्न आणि 1(जे) अन्वये सादर करण्यात येत असलेल्या नोटीस संदर्भात सर्वसमावेश धोरण ठरवून अहवाल सादर करण्याकरिता सभागृहातील जेष्ठ सदस्यांची समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येते. या समितीने आपला अहवाल एक महिन्याच्या आंत महानगरपालिकेच्या सभेत सादर करावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

| | |
|---|---|
| 1.श्री.दयाशंकर तिवारी | अध्यक्ष |
| 2.श्री.प्रवीण दटके | सदस्य |
| 3.श्री.सुनिल अग्रवाल | सदस्य |
| 4.श्री.प्रफुल्ल गुडधे | सदस्य |

5.श्री.नरेंद्र वालदे सदस्य

महापौरः— प्रश्नोत्तराचा तासाला सुरुवात करुया 1 तासात आपल्याला प्रश्न संपवायचे आहे.

**<u>प्रश्न 42</u>**ः— नागपूर महानगरपालिकेच्या एकूण 164 शाळा असून या शाळेकरिता किती सुरक्षा रक्षक तैनात असून महिला सुरक्षा रक्षकांना कोणत्या कारणास्तव कमी करण्यात आले संदर्भात प्रश्न

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी, जो प्रश्न लिखा हुआ है उसमे जो उत्तर दिया है उसमे निश्चितीरुप से जानकारी गलत दी है। मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेमध्ये एकुण जी शाळा दाखविली आहे उत्तरपत्रिकामध्ये ती 154 दाखविली आहे. 164 शाळांची यादी माझ्याकडे आहे. जेव्हा केंद्र सरकारच्या माध्यमातुन "बेटी बचाव, बेटी पढाव" का प्रस्ताव आगे बढाया हुवा है उसके उपर अगर ध्यान दिया तो बेटी पढाव समझ मे आता लेकीन बेटी बचाव ये समझ के पर हो रहा है। इसलिये इसको बहोत गहराई समझने की और सोचने की कोशिश कर रहा हु की जब केंद्र सरकार और राज्य सरकार इस चिजो को लेकर इतनी गंभीर है तो नागपूर महानगरपालिका मे किस प्रकार से इसका संचालन कर रहे है। ये जो शालाये है यह शालायोंमे नागपूर महानगरपालिका के 164 शालामें सभी स्कुलों मे स्त्री बच्चीया है और सुरक्षा के माध्यम से हमने सिर्फ जेन्टस् सुरक्षाकर्मी रखे है कहीपर भी महिला सुरक्षाकर्मी का इनव्हॉलमेंट नही है। तो इसके पिछे का क्या कारण है। और जहापर महिला सुरक्षा कर्मी लगे हुये थे वो क्यौ निकाल दिये उसकी जानकारी दि जायें।

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

सहा आयुक्त (श्री.धामेचा) :— सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.कमलेशजी चौधरी यांनी जो प्रश्न विचारला होता की महानगरपालिकेच्या शाळामध्ये या पुर्वी महिला सुरक्षाकर्मी तैनात असायचे त्यांना कोणत्या कारणास्तव कमी करण्यात आले होते. महानगरपालिकेत 2012 च्या पुर्वी महिला सुरक्षा रक्षक आपण तैनात करीत होतो मात्र एप्रिल, 2013 ला जकात कर बंद झाल्यानंतर जकात कर विभागाचे वर्ग 4 चे कर्मचारी आहे.

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी वर्ग 4 च्या कर्मचारीमध्ये किती महिला कर्मचाऱ्यांचा समावेश आहे त्याची माहिती देण्यात यावी.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, 51 बहुउद्येशिय महिलासुरक्षा रक्षक कार्यरत होते. याच्यात बहुउद्येशिय याच्यासाठी की चपराशी आणि पाणीदेण्याचेही तेच काम करीत होते आणि सुरक्षा रक्षक असे बहुउद्येशिय काम करीत होते फक्त सुरक्षा रक्षक म्हणुन नव्हते.

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी, माझे म्हणणे हे आहे की जेव्हा आपण तेथे सुरक्षेच्या दृष्टिने सुरक्षा रक्षक महिला सुरक्षा रक्षक दिले होते ते बंद केल्यानंतर आपण तेथे काही महिला सुरक्षा रक्षक तेथे दिले आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी, मी आधीच सांगितल्या प्रमाणे आपल्या जकात विभागाने साधारणतः 143 कर्मचारी तेथे होते.

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी, ज्या ठिकाणी आपण महिला सुरक्षाकर्मी बंद केले होते तेथे आपण महिला सुरक्षाकर्मी दिले आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— मा.महापौरजी 143 जे कर्मचारी होते त्यामध्ये महिला व पुरुष अशी कंम्बाईन आकडेवारी आहे.

श्री.कमलेश चौधरी :— मा.महापौरजी, दिल्लीमध्ये ऐवढे मोठे प्रकरण घडले आहे प्रद्युन्म हत्याकांड हे जे कांड झाले आहे ते सर्वांच्या माहितीमध्ये आहे. आणि इतके मोठे प्रकरण दिल्लीमध्ये झाले आणि नागपूर शहरात जास्तीत जास्त प्रायव्हेट शाळामध्ये, जिल्हा परिषदच्या शाळामध्ये चेकींग चालु झाली आहे. पोलीस निरीक्षक, सहा.आयुक्त पोलीस निरीक्षक, डि.वाय.एस.पी. हे सर्व लोक शाळामध्ये जावुन ते तपासणी करीत आहे. ते तपासणी करतांना ते हे सुध्दा बघत आहे की ज्या शाळामध्ये स्त्री विद्यार्थी शिकत आहे, वाचत आहे, तेथे महिला सुरक्षाकर्मी नेमलेले आहे काय? पण आपल्याकडे असे काही आहे काय? आपल्या महानगपालिकेच्या शाळामध्ये अशी काही चेकींग झाली आहे काय? चेंकींग जर झाली नसेल तर ती का नाही झाली त्याची सुध्दा आपण माहिती घेतली आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :— सन्माननिय महापौरजी, सद्या आपल्या शाळांच्या इमारती एकुण 99 आहे आणि त्यामध्ये 97 सुरक्षारक्षक कार्यरत आहे आणि त्या व्यतिरिक्त शिक्षण विभागाव्दारे 24 शाळामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे

सुरक्षा व्यवस्थेकरिता लावण्यात आले आहे.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, ज्या शाळामध्ये 8 वी ते 10 च्या विद्यार्थीनी आहे तेथे आपण पाहणी केली आहे काय? तेथे आपण महिला सुरक्षारक्षक दिलेले आहे काय? हा खुप सेनसेटीव्ह विषय आहे जर समजा काही अनुचित घटना घडली तर त्याची जबाबदारी कोणी घेणार आहे काय? आपण शाळामध्ये कुठल्याही प्रकारची महिला सुरक्षारक्षक दिलेले नाही.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, हा प्रश्न उपस्थित केलेला आहे मा.सदस्य श्री.कमलेश चौधरी यांनी हा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. महिला सुरक्षेबाबत प्रशासनानी गंभीर रहावे कारण ज्या ज्या शाळांमध्ये 5 वी ते 10 पर्यत शिकणा–या विद्यार्थीनी आहे त्या वयोमानाने मोठया असतात त्या कारणांनी त्यांची जबाबदारी महिला सुरक्षारक्षकांनी केली पाहिजे परंतु आपण पुरुष सुरक्षा रक्षक ठेवले आहे. त्याऐवजी 50 टक्के महिला सुरक्षारक्षक ठेवण्यात यावे असे आपण निर्देश दयावे असे मला वाटते कारण की देशामध्ये फार गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे महिलांबाबत आपण मोठमोठया योजना राबवितो त्याचप्रमाणे महिलांच्या सुरक्षेसंदर्भात देखील आपण लक्ष दयावे अशी माझी विनंती आहे.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, याच्यामध्ये आणखी एक विषय असा आहे की नागपूर शहराला स्मार्ट सिटी बनविण्याकरिता सर्व सदस्य सत्तापक्ष किंवा विरोधी पक्ष सर्व लोक लागले आहे आणि स्मार्टसिटीच्या माध्यमातुन चौकांचौकांमध्ये कॅमेरे लावलेले आहे परंतु आपले नागपूर नागपूर महानगरपालिकेच्या शाळामध्ये एकही कॅमेरा आपण अजुनपर्यत लावलेला नाही.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, 24 शाळामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे लागलेले आहे.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी ज्या शाळेमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे लागले नाही तेथे त्वरीत सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्यासाठी ॲक्शन घ्यावी आणि महिलासुरक्षेबाबत आपण जर एक इनेशिटीव्ह घेतला तर चांगले होईल असे मला वाटते.

सौ.हर्षला साबळे :– मा.महापौरजी, काही काहीच शाळेमध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे लागले आहे ते पुर्ण शाळेमध्ये लावण्यात यावे.

महापौर :– या विषयाच्या संदर्भात प्रशासनाने शाळेत शिकणा–या सर्व मुलींची काळजी घेणे आवश्यक आहे. महिला व मुलीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महिला सुरक्षा गार्डला प्रायरिटी देवून त्वरित ठेवण्यात यावे. त्याचबरोबर सर्व शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी त्वरित कार्यवाहीची सुरूवात करावी.

**<u>प्रश्न क्र 43:–</u>** महानगरपालिकेच्या स्वास्थ विभागाद्वारे फायलेरिया विभागामार्फत शहरात किती कर्मचारी कार्यरत आहेत? संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः– वितरीत केल्याप्रमाणे

**<u>प्रश्न क्र 44</u>**:– महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रात विविध भागात मोकाट कुत्र्यांना पकडून विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संदर्भात प्रश्न

श्री. जुल्फेकार भुट्टो :– मा.महापौरजी, मा.आयुक्त, सत्तापक्षनेते, विरोधी पक्षनेते सर्व पदाधिकारी, अधिकारीगण नागपूर शहर मे कुत्तो का आतंक हो गया है कई जगहा कुत्तोने बच्चे को बुढो को और जो खुजली वाले कुत्तेपर बहोत सारी जनता नागपूर शहर की परेशान है। कुत्ते का जो युनिट नागपूर महानगरपालिका मे चलाते है। उसमे क्या क्या जनता के लिये उसमे सुविधा है और जनता को उसमे कैसी राहत मिलेंगी और कितने लोगो का युनिट वहापर काम करता है, और कैसे झोनवाईज काम यहापर शुरु है इसकी सभागृह को प्रशासन व्दारा जानकारी दी जाये।

महापौर :– प्रशासनानी उत्तर दयावे.

पशुचिकीत्सा अधिकारी (डॉ.महल्ले) :– मा.महापौरजी, मोकाट कुत्र्यासंदर्भात काही सुप्रीम कोर्टाचे निर्देश आहे. नॅशनल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीयाच्या गाईड लाईन आहेत, काही मार्गदर्शक तत्व आहेत.त्या मार्गदर्शक तत्वानुसार मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करण्यात येतो. केवळ मोकाट कुत्र्यांची नसबंदी करुन त्यांना व्हॅक्सीनेशन करुन त्यांना परत त्या ठिकाणी सोडणे हा एक उपाय सुचविला आहे. नॅशनल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडीया एक नामांकित संस्था आहे त्यांनी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट दिले आहे नॅशलन वेलफेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या रिकगनाईज संस्थेमार्फत व

एनजीओ मार्फत ही योजना राबविण्यात येत आहे ही प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे लवकरच नसबंदी करण्याची मोहीम राबविण्यात येईल.

श्री.जुल्फेकार भुट्टो :— मा.महापौरजी, जो कुत्ते पकडने के लिये बार बार झोन मे कंम्पलेंट करने के बाद भी जो टिम है जो टिम उस क्षेत्र मे नही जाती है। अगर उस क्षेत्र मे टिम चले भी गयी तो वह समय पास करने के बाद नगरसेवक के यहा जाकर एक रजिस्टर पे साईन लेने का काम करते है । सिर्फ अपनी व्हीजिट बताते है इसमे जो लोग काम कर रहे है मेरे हिसाब से और कई सारे नगरसेवक इस चिज से पिडीत है। सारे लोग इससे परेशान है कई जगह पर छोटे छोटे बच्चो को काट देते है। कई जगह बुजुर्ग को काटते है। कई जगह रात मे जाने पर लपकते है, तो उसमे जो हमारी टिम काम कर रही है वह टिम बरोबर से काम नही कर रही है। इस बारे मे मुझे विस्तारपुर्वक बताइयें की हमारे महल झोन मे 1 महिनेमे क्या कारवाई की गयी और इन कुत्तो को पकड कर उनको नसबंदी करायी गयी और उनको सुरक्षित जगह पहुचाया गया।

पशुचिकित्सा् अधिकारी (श्री.महल्ले) :— सन्माननिय महापौरजी, मोकाट कुत्र्यांची नसबंदीचा उपक्रम 2006 पासुन होता सन 2006—2007 मध्ये एकुण 17,171 कुत्र्यांची नसबंदी केली आहे. सन 2007—2008, 2008—2009 आणि 2009—2010 या वर्षामध्ये नसबंदी केलेली आहे.

श्री.जुल्फेकार भुट्टो :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, 2006 साल का मत बतायीयें अभी जो लेटेस्ट 2 साल मे क्या किया उसका बतायीयें।

पशुचिकित्सा् अधिकारी (श्री.महल्ले) :— सन्माननिय महापौरजी, सन 2015—16 मध्ये 2,836 कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे त्यानंतर पशुवैद्यकीय शासकीय महाविद्यालय यांना ऑपरेशन करण्याचे काम दिले होते परंतु त्यांचे काम फार कमी होते दिवसाला एकच कुत्र्यांची नसबंदी करण्यात येत होती त्या स्पीडने जर नसबंदी केली तर ही बाब कधीही संपणार नाही ही बाब लक्षात घेता आपण दोन अशासकीय संस्थेची निवड केली आहे. त्याच्यासोबत ॲग्रीमेंट सुध्दा झालेला आहे लवकरच ही मोहीम आता सुरु होणार आहे. चालु वर्षामध्ये नसबंदीची मोहीम झालेली नाही.

श्री.जुल्फेकार भुट्टो :— मा.महापौरजी यह मोहीम कब चालु होंगी।

पशुचिकित्सा् अधिकारी (श्री.महल्ले) :— सन्माननिय महापौरजी, 1 महिन्याच्या आत ही मोहीम सुरु होईल.

श्री.पुरुषोत्तम हजारे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन ज्या कुत्र्यांची आपण नसबंदी करणार आहे त्या कुत्र्यांना कोणत्या परिसरामध्ये सोडले जाते.

पशुचिकित्सा् अधिकारी (श्री.महल्ले) :— सन्माननिय महापौरजी, ज्या कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे त्यांना इतर परिसरामध्ये सोडता येत नाही त्यांना ज्या परिसरामध्ये पकडले आहे त्याच परिसरामध्ये त्यांना सोडावे लागते.

श्री.पुरुषोत्तम हजारे :— मा.महापौरजी, प्रभाग क्र 25 आणि 26 मध्ये मला असे वाटते की कमीत कमी 7 ते 8 हजार कुत्र्यांचे झुंडच्या झुंड त्या डंम्पींग यार्डच्या बाजुला बसले असते, पुर्ण नागपूर शहरातले जे लोकांना चावा घेणारे कुत्रे असो, किंवा पागल झालेले कुत्रे असो किंवा दुखापत झालेले कुत्रे असो ते पुर्ण आमच्या परिसरात आणुन सोडतात आणि आमच्या परिसरातील नागरिकांना सर्वात जास्त त्या कुत्र्यांचा त्रास होत आहे.

श्री.मोहम्मद जमाल :— मा.महापौरजी, अभी डॉक्टर साहब ने बताया की जिस परिसर मे कुत्ते को पकड कर ले जायेंगे उनकी नसबंदी करने के बाद उसी परिसर मे उन कुत्तोकों छोड दिया जाता हैं। मा.महापौरजी, मै आपको यह जानकारी देना चाहता हुँ की नसबंदी के बाद कुत्ता और घातक हो जाता है। उस परिसर के अंदर उन नागरिकों को और जादा परेशानी होने की संभावना है, इसलिये इस बात को ध्यान मे रखकर उनकी पर्यायी व्यवस्था की जायें उन कुत्तों को ऐसी जगह छोडा जायें जहा लोगों को उन कुत्तोसे परेशानी न हो।

महापौर :— कुत्र्यांचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. महानगरपालिकेने त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी. अशा कुत्र्यांची नसबंदी करण्याची कार्यवाही शक्य तितक्या लवकर करण्याच्या दृष्टीकोनातून अशासकीय संस्थेला सहभागी करून घ्यावे.

श्री.प्रदीप पोहाणे :— मा.महापौरजी, इतर परिसरातील कुत्र्यांना भांडेवाडी येथे आणुन सोडु नये (बेल)

श्री.पुरुषोत्तम हजारे :— मा.महापौरजी, कुत्र्यांप्रमाणे आमच्या प्रभागात डुकरांचे प्रमाण सुध्दा जास्त आहे याकडे सुध्दा आपण लक्ष दयावे आणि त्या बद्दल प्रशासनाला निर्देश दयावे.

<u>**प्रश्न क्र. 45**</u> :— नागपूर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना पेंच—4, पार्ट—1

संदर्भात प्रश्न

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, दि.16/10/2017 च्या सभेचा विषय आहे आणि तेव्हा मला याचे उत्तर मिळाले होते त्यामध्ये प्रश्न असा होता की नागपूर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना पेंच 4 पार्ट 1 योजने करिता कर्ज कोणत्या बॅकेकडुन, कोणत्या वर्षाला आणि किती कर्ज घेतलेले आहे आणि त्या कर्जाचा व्याजदर किती आहे आणि व्याजदरा करिता बॅकेंशी करारनामा करण्यात आला आहे काय ? व्याजापोटी आता पर्यत बॅकेला किती रक्कम बॅकेला अदा करण्यात आली आहे. कर्जाची किती रक्कम शिल्लक आहे ? असा हा प्रश्न होता या प्रश्नाचे उत्तर मला मागेही मिळाले आहे आणि या ही वेळा मिळालेले आहे. मागे जे प्रश्नांचे उत्तर मिळाले आहे तो अशा प्रकारे आहे. नागपूर महानगरपालिके मार्फत जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत नागपूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना पेंच 4 पार्ट 1 करीता मनपा च्या हिताची रक्कम उभारणी करिता बॅक ऑफ महाराष्ट्र कडुन रु 200 कोटीचे कर्ज दि.31/03/2010 रोजी घेतलेले आहे. सदर कर्जाचा व्याजदर हा 8.5 टक्के असा ठेवला आहे येथपर्यत ठिक आहे. मग या नंतर या कर्जाच्या व्याजापोटी आपण 212 करोड 96 लक्ष 15 हजार 165 रु दिले आहे म्हणजे 200 करोडच्या अगेंस्टमध्ये 212 करोड रुपयांचा व्याज दिले आहे असे उत्तर दिले आहे. आणि मुद्दल जी दिलेली आहे ती 166 करोड 26 लाख 62 हजार 173 आणि मुद्दलीची परतफेड राहिलेली आहे. ती 33 करोड 73 लाख 34 हजार 870 रु आहे असे सभागृहाचे उत्तर आहे आता या सभागृहामध्ये पुन्हा विषय आला आणि विषय आल्यानंतर पुन्हा त्या विषयाचे उत्तर जरा वेगळे दिले आहे याच्यामध्ये उत्तर दिले आहे पेंच 4 पार्ट 1 करीता कर्ज घेतले आहे. बॅक ऑफ महाराष्ट्र कडुन जे कर्ज घेतले आहे 200 कोटी रुपयांचे दि. 31/03/2010 रोजी घेतलेला कर्जाचा व्याजदर 9.5 टक्के आहे. याच्या आधी जे उत्तर दिले होते ते 8.5 टक्के आता जे उत्तर दिले आहे त्यामध्ये 9.5 टक्के आणि सोबतच त्याच्यामध्ये आणखी एक दिले आहे की व्याजापोटी 87 करोड 86 लाख रु दिले आहे मागच्या उत्तरामध्ये सांगते की 212 करोड रु दिले. आता सांगतात की व्याजापोटी आम्ही 87 करोड 86 लक्ष रु दिले आणि 171 करोड मुद्दल दिले. या दोन प्रश्नापैकी कोणता प्रश्न बरोबर आहे. कोणत्या प्रश्नांचे उत्तर बरोबर आहे ते उत्तर प्रशासनाने दयावे की मागील उत्तर बरोबर होते की आता जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

प्र.ले.वि.अ. (श्रीमती मोना ठाकुर) :— मा.महापौरजी, यामध्ये आता जे उत्तर देण्यात आलेले आहे ते बरोबर आहे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, चांगले झाले हे उत्तर बरोबर आहे नाहीतर जनतेचा 200 करोड च्या अगेस्टमध्ये 212 करोड रुपये गेले असे झाले असते. आपण 9.5 टक्के आणि 8.5 टक्क्यांचा घोळ काय याचे उत्तर दयावे.

प्र.ले.वि.अ. (श्रीमती मोना ठाकुर) :— मा.महापौरजी, बॅकेशी करार करण्यात आला होता तेव्हा बॅकेचा रेट होता तो 9.5 टक्के होता. 2010 ला रिझर्व्ह बॅकेंची व्याजदर घेण्याची पॉलिसी बदलली. त्यानंतर मग घेतांना बेसरेटने घेतले होते त्यानंतर जेव्हा आर.बी.आय. ने पॉलिसी चेंज केली त्यामध्ये प्राईम बेस स्टॅडींग रेट होती त्यामध्ये जे ठरविले गेले करारामध्ये कुठेही असे नमुद नाही आहे की आपण फिक्स रेटने घेवु तो फलोटींग रेट राहतो.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, मी स्वतः काही उत्तर देणार नाही हा महानगपालिकेच्या दस्तऐवजांचा माझ्याकडे गठ्ठा आहे. याच्यामध्ये 9/10/2010 चे पत्र आहे. पहिले पत्र असे आहे ज्याच्यामध्ये आम्ही उल्लेख केले आहे की 200 कोटी रुपयांचे कर्ज 9.5 टक्के दराने आम्ही मंजूर केले आहे. आणि तुम्ही जे पत्र देतांना म्हटले आहे की या कर्जाकरीता बॅकेमार्फत देण्यात आलेला व्याजदर 9.5 टक्के आहे इतर वित्तीय संस्थांनी या व्याजदरापेक्षा कमी दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. जर आपणच बॅकेंला म्हटले की इतर वित्तीय संस्था 9.5 टक्कयांपेक्षा ही कमी दरामध्ये लोन उपलब्ध करायला तयार आहे तर आपण का घेतले नाही. आपण हे पत्र दिले होते 9.5 टक्के दरांपेक्षाही कमी दराने इतर वित्तीय संस्था महानगरपालिकेला लोन दयायला तयार होती तर आम्ही 9.5 टक्कयांनी का घेतले. पत्राची तारीख आहे 9/10/2010 प्रति, महानिबंधक, बॅक ऑफ महाराष्ट्र, सिताबर्डी नागपूर. या पत्रावर जी सही आहे ती अति.उपायुक्त यांची आहे.

प्र.ले.वि.अ. (श्रीमती मोना ठाकुर) :— मा.महापौरजी, बॅकेचे व्याजदर जे आहे ते रिझर्व्ह बॅकेच्या धोरणानुसारच तय केले जाते.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, माझा पहिला प्रश्न हा आहे जेव्हा बाकीच्या वित्तीय संस्था आम्हाला 9.5 टक्के दरांपेक्षा कमी दराने लोन देण्याकरिता तयार होते तर आम्ही बॅक ऑफ महाराष्ट्र कडुन लोन कशाला घेतले.

प्र.ले.वि.अ. (श्रीमती मोना ठाकुर) :– मा.महापौरजी, हे जे लोन होते ते ओव्हरड्राफट म्हणुन होते.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, प्रश्न एकदम सोपा आहे त्या प्रश्नांचे उत्तर मिळत नाही आहे.

श्री.सुनिल अग्रवाल :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन जब मा.सदस्य संदीपजी सहारेजीं ने जिस पत्र का उल्लेख किया है वह पत्र अंतिम है की उसके बाद का भी लेखाजोखा हुआ है क्या उसकी पुरी जानकारी जब तक उपलब्ध नही होती तो कौन उसका जवाब दे सकता है।

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.अग्रवाल साहेब बरोबर बोलले आणि माझ्याकडे पुर्ण गठ्ठा आहे आणि हा गठ्ठा मला माहितीच्या अधिकारान्वये नागपूर महानगरपालिकेच्या कार्यालयातुन मिळाला आहे आणि म्हणुन त्या बळावर मी सांगु इच्छितो की जेव्हा इतर वित्तीय संस्था कमी दराने पैसे दयायला तयार होते तर मग आपण 9.5 टक्कें दराने का घेतले आणि त्यावेळेस सत्तापक्ष नेता जे आता आहे त्यावेळेस ते स्थायी समिती अध्यक्ष होते त्यांनी नियम, अटी आणि शर्तीच्या अधीन राहुन निर्णय घ्यावा असे म्हटले होते. त्यानंतरही प्रशासनाने त्यांनी दिलेल्या निर्देशालाही धुळ चारली हे ही तितकेच खरे आहे त्यांचे देखील पत्र आहे. त्यांनी निर्देश दिले होते की त्यापेक्षा कमी दराने लोन देणारी वित्तीय संस्था असेल त्यांच्याकडुन लोन घ्यावे या अधिकारी जर या प्रश्नांचे उत्तर देवु शकत नसेल तर जे अधिकारी या प्रश्नांचे उत्तर देईल त्यांना येथे बोलविण्यात यावे. जेव्हा आपल्याला कमी दराने लोन मिळत होते तर का घेतले नाही.

प्र.ले.वि.अ. (श्रीमती मोना ठाकुर) :– मा.महापौरजी, आपण ज्या पत्राचा उल्लेख केला आहे त्यानुसार बॅक ऑफ महाराष्ट्राला आम्ही विनंती केली होती त्यानुसार जे आपल्याला प्रस्तावना दिलेली आहे त्यामध्ये आपणाला दिसते.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, जी प्रस्तावना येथे दिली आहे त्याच्यामध्ये देखील अधिकारी फसणार आहे. आपण माहिती देत जाता आणि त्यामध्ये आपणच फसत जाता माझा पहिला प्रश्न असा आहे की 9.5 टक्के दराने लोन घ्यायची गरज आपणास का भासली जेव्हा इतर वित्तीय संस्था आपणाला कमी दराने लोन दयायला तयार होते तेव्हा यामध्ये करोडो रुपयांचा लॉस झालेला आहे. नागपूर महानगरपालिकेचा तो कोण भरणार आहे. त्या दिवशी सहा.आयुक्त श्री.हरीश राऊत यांनी लिलावाची निलामी केली नाही तर त्यांच्यावर कारवाई केले आणि मग येथे करोडो रुपयांचा लॉस झाला आहे तर मग तो लॉस कोण भरुन देणार आहे. आमच्या फाईली होत नाही.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मला असे वाटते की या विषयावर सन्माननिय आयुक्तांनी सुध्दा काही प्रकाश टाकला पाहिजे कारण बॅकींगचे जे काही नियम असतात ते नियम वेगवेगळया प्रकारचे असतात कुठेतरी महानगरपालिकेने हे म्हणत असतांना दुसरे पत्र देखील आहे की 8.5 टक्कयांनी लोन घेत असतांना तुम्ही आमच्याशी बार्गीनिंग करा म्हणजे याच्यावर चर्चा करा जर आपल्याला यापेक्षा कमी दराने लोन मिळत असतील तर तुम्ही दया असे पत्र आहे त्यामुळे याच्यामध्ये फार मोठा घोटाळा झालेला आहे, फार मोठी गडबड झालेली आहे, महानगरपालिकेचा लॉस झालेला आहे हे चित्र त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन जर ते ठेवत असतील तर मला असे वाटते की मा.आयुक्तांनी यावर निवेदन करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण आजकाल हे फार सोपे झालेले आहे की या पत्राच्या भरवश्यावर काही ना काही या पध्दतीचे निर्देश असतील तर त्यावर मा.आयुक्तांनी प्रकाश टाकावा.

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मी एकाच पत्रावर नाही तर माझ्याकडे अनेक पत्र आहे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी मा.सदस्यांकडे जर 100 पत्र असेल तर 100 पत्रावर सुध्दा मा.आयुक्तांनी निवेदन करावे.

महापौर :– आयुक्तांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका मार्फेत जे.एन.एन.यु.आर.एम योजना अंतर्गत नागपूर शहराला वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी वर्ष 2010 मध्ये बॅक ऑफ महाराष्ट्र कडुन 200 कोटी रुपयांचा कर्ज घेण्यात आले होते हे कर्ज घेत असतांना तत्कालीन जी बॅक रेटची पॉलीसी होती त्याच्यामध्ये नंतरच्या कालावधी मध्ये 2014 मध्ये आणि 2016 मध्ये जे काही बदल होत गेले त्याप्रमाणे कर्जाचे दर बदलत गेले आहे. कर्जाचे दर संपुर्ण डिफॉल्ट आहे ते बॅक ऑफ महाराष्ट्र कडुन घेतले आहे. बॅक ऑफ महाराष्ट्र ने देखील त्यांच्या स्तरावर या विषयांच्या अनुषंगाने सविस्तर पेपर मध्ये प्रेसनोट देखील दिलेली आहे. तत्कालीन 2010 मध्ये 9.5 टक्केचा जो दर आहे ते कमी करा असे पत्र देण्यात आले होते. कारण इतर वित्तीय संस्थाच्या माध्यमातुन कमी प्रमाणामध्ये आणि कमी रेटमध्ये कर्ज देण्याची शक्यता होती त्याच्यानंतरचे जे रिझर्व बॅकेचे जे गाईड लाईन आले त्या गाईड लाईन

अन्वये एक रेंज फिक्स करण्यात आला 9.1 ते 9.7 हा रेंज कर्जाचा फिक्स करण्यात आला त्या कर्जाचा रेंज अन्वये त्या कर्जाचा रेट फिक्स करण्यात आला या अनुषंगाने त्याच्यानंतर पुन्हा 2016 मध्ये पुन्हा आर.बी.आय. च्या गाईड लाईन चेंज झाले आणि आर.बी.आय. च्या गाईड लाईन अन्वये महानगरपालिकेचा जो कर आहे त्या कर्जाचे दर निश्चित झालेले आहे. यावेळी सुरुवातीला जी इन्फॉर्मेशन देण्यात आली होती त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त पेमंट झालेले आहे तर त्यामध्ये सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये रितसर त्याचे उत्तर आकडेवारीसह देण्यात आले आहे. या अनुषंगाने बॅक ऑफ महाराष्ट्र कडुन प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडुन स्पष्टीकरण प्राप्त झाले आहे ते देखील उपलब्ध आहे. सन्माननिय सदस्यांनी त्याचे देखील अवलोकन करावे आणि त्या अन्वये आणखी देखील त्यामध्ये त्याचे विषय असतील तर त्यामध्ये आपण चर्चा करुन त्यावर आवश्यक ती कार्यवाही करु.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, यावर ऑडीट ऑब्जेक्शन आले आहे. त्या ऑडीट ऑब्जेक्शनची कॉपी माझ्याकडे आहे म्हणुन मी येथे बोल आहे नाही तर मा.आयुक्तांनी उत्तर दिल्यानंतर मी चुपचाप बसलो असतो. दि. 27/06/2013 ला बॅकेला पत्र दिले त्या पत्रामध्ये सरळ म्हणाले बॅक ऑफ महाराष्ट्र व नागपूर महानगरपालिका मध्ये दि. 31/03/2010 रोजी करारनामा करण्यात आला असुन सदर करारनामाची आणि तत्कालीन मा.आयुक्त व मा.स्थायी समिती अध्यक्ष व बॅकेचे प्रतिनिधी यांच्या 27/06/2010 रोजी झालेल्या वाटाघाटी नंतर आपल्या बॅकेव्दारे या कर्जाचे व्याजदर 9.5 टक्क्यांवरुन 8.5 टक्यांपर्यंत कमी करुन निश्चीत करण्यात आले आहे. परंतु सदर प्रकरणी असे निर्देशनास आले आपल्या बॅकेव्दारे परत फेडीची मुद्दल व व्याजाच्या मागणीमध्ये ही व्याजाची आकारणी करारनाम्यामध्ये फिक्स रेटनी आम्ही त्यामध्ये भुगतान देण्यात आले करारनामा झाला त्यामध्ये स्थायी समिती अध्यक्ष, म.न.पा आयुक्त बॅकेंचे प्रतिनिधी ते झाल्यानंतर जर ते फिक्स रेटनी कर्ज दयायला ते तयार होते, करारनामा झाला तर करारनामाचे उल्लघन कसे झाले.

महापौर :— या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाकडून आता देता येत नसेल तर मा.सदस्य श्री.संदीप सहारे, मा. आयुक्त व मी आपण तिघेही सोबत बसुन या विषयावर चर्चा करून माहिती विषद करून घेवू. याकरिता जे कुणी जबाबदार असतील त्यांच्यावर पेनॉल्टी लावण्यात येईल.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, ज्यांनी यामध्ये अशा प्रकारचे व्यवहार केला आहे त्यांच्यावर काय कार्यवाही कराल.

महापौर :— त्याच्यावर पेनॉल्टी लावण्यात येईल.

**<u>प्रश्न क्र 46</u>**:— नागपूर महानगरपालिका ने म.न.पा. स्कूलो का शिक्षा का दर्जा बढाने संदर्भात

श्री.मोहम्मद जमाल :— मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेता मा.विरोधी पक्ष नेता मा.अधिकारीगण, मै इस प्रश्न के उपर विशेष ध्यान देने का आग्रह करता हुं। नागपूर महानगरपालिका शिक्षण विभाग को मैने एक प्रश्न दिया था। नागपूर शहर के अंदर हमने शिक्षणस्तर को बढाने के लिये क्या क्या उपाय योजना की है उसकी पुरी जानकारी दि जायें। उसके अंतर्गत जो मुझे जवाब आया उस जवाब के अंदर शिक्षा का स्तर बढाने के लिये हमने बच्चोकों गणवेश बाटा, पुस्तके दी, सायकल की व्यवस्था की, बस की अरेंजमेंट की, मोफत पास दिये। किस तरीके से मुझे जवाब दिया गया शिक्षण विभाग से मा.महापौरजी, शिक्षण का स्तर बढाने के लिये क्या योजना बननी चाहियें पहले तो जबाबदारी अधिकारी मुझे इसका जवाब दे।

महापौर :— उत्तर पत्रिकेमध्ये 17 पॉइंट दिलेले आहे, त्याच्याव्यतिरिक्त काय सुचवायचे असेल ते सुचवावे.

श्री.मोहम्मद जमाल :— मा.महापौरजी, ते 17 पॉइंट वाचल्यावर शिक्षणाचा स्तर वाढणार आहे काय? इसके पहले कई बार सभागृह के अंदर सुझाव आये

महापौर :— शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी आपण वर्कशॉप घेतले त्यासाठी सर्वाचा सहभाग पाहिजे.

श्री.मोहम्मद जमाल :— मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकाने इसके लिये क्या उपाय योजना करनी चाहिंये ।हम लोग स्कुल के अंदर बच्चो को पढने के लिये भेजते है। भारत सरकारने डिजीटल इंडिया का नारा जोरो शोरो के साथ चल रहा है। अगर हमारे शिक्षण का स्तर इसी तरीके से रहा तो हम डिजीटल इंडिया के तरफ बढ पायेंगे। जिस तरीके की एज्युकेशन फॅसिलीटी हमारी महानगरपालिका की स्कुलों मे है उसका सबसे बडा प्रमुख कारण हमारे यहा पढाने वाले जो शिक्षकगण है मै लगातार शिक्षणाधिकारी से मा.उपायुक्त मॅडम है लाडे मॅडम उनके पास जाकर इस विषय पर चर्चा करते रहता हुं। मै खुद देखता हुं की बच्चों को पढाने वाले शिक्षक

का स्तर कब बढे और इसके पहले नागपूर महानगरपालिकाने पायलट सिस्टम चालु किया था। वो पायलट सिस्टम का क्या हुआ इसकी भी जानकारी हमे नही दी गयी। दुसरा एक विषय मेरी जानकारी मै है की एच.आर.डी. मिनीस्ट्री व्दारा नागपूर शहर के 7 स्कुलो को ॲडॉप्ट किया गया है। डिजीटल इंडीया के अंतर्गत वह 7 स्कुले कौनकौनसी है। जिनको एच.आर.डी. मिनीस्ट्री ने ॲडॉप्ट किया गया है इसकी जानकारी संबंधित अधिकारीने दि जाये।

शिक्षणाधिकारी (श्रीमती मेडपल्लीवार) :— मा.महापौरजी, आदरणिय सदन मा.आयुक्त महोदय, यामध्ये मा. सदस्यांनी विचारले आहे की 7 शाळा कोणत्या आहे त्यामध्ये संजय नगर माध्यमिक शाळा, वाल्मीकी नगर हिंदी माध्यमिक शाळा, विवेकानंद हिंदी माध्यमिक शाळा, लालबहाद्युर शाळा, या ॲडॉप्ट केल्या आहेत.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, शिक्षणाधिकाऱ्यांना शाळेच्या बाबत संपुर्ण माहिती नसतांना सुध्दा यांना कशाला शिक्षणाधिकारी म्हणुन नियुक्त केले आहे. कपीलनगरची जी शाळा आहे त्यामध्ये पाहिल्या वर्गापासुन ते 10 व्या वर्गापर्यत शाळा आहे. त्या शाळेला सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्यात आले. दवाखाना, वाचनालय, बगीचा, खेळाचे मैदान, पाण्याची टाकी हे असतांना देखील त्या शाळेला का घेण्यात आले नाही. आंतराष्ट्रीय लेव्हलचे लोक त्या शाळेला पाहण्याकरिता आले होते. त्या शाळेचा आपल्या अर्थसंकल्पाच्या पुस्तकामध्ये त्या शाळेचे चित्र दाखविण्यात आलेले होते मग का त्या शाळेला घेण्यात आले नाही. आय.ए.एस. अधिकारी असलेले आयुक्त महोदयांच्या अखत्यारित जे अधिकारी आहे त्यांनी तेथे व्हीजीट दिली काय ? म्हणजे जो दर्जा शिक्षणाचा खालवला जात आहे त्याला कुठेतरी ब्रेक लागला पाहिजे अशी व्यवस्था आपण करणार आहे काय? तेथे किती लोकांना ससपेंड करणार आहे, किती लोकांची वेतनवृध्दी थांबविणार आहे यावर चर्चा करायला पाहिजे तेव्हाच शिक्षणाचा दर्जा वाढेल.

श्री.मोहम्मद जमाल :— मा.महापौरजी, शिक्षण स्तर को बढाने के लिये सबसे पहले मा.महापौरजी महाराष्ट्र के अंदर मुंबई महानगरपालिका के अंतर्गत लगभग 272 स्कुल पायलट बेसीस के उपर इंग्लीश मिडीयम की चल रही है। जिसे मुंबई महानगरपालिका चला रही है। हमने भी नागपूर महानगरपालिका के अंतर्गत जहापर हमारे पास इतनी बडी बडी इमारते है, बडी बडी जगह है। आज प्रायव्हेट स्कुलो को जगह देने के लिये फ्युचर मे प्लानिंग हो सकती है लिज के उपर दे दे हम लोग उतनी जगह का उपयोग क्यौ नही करते जिस तरीके से नागपूर महानगरपालिका टॅक्स के अंदर एज्युकेशन कर हम लोग नागपूर महानगरपालिका प्रॉपर्टी टॅक्स के अंदर एक एज्युकेशन कर लेते है। यह एज्युकेशन कर कितना आता है। एज्युकेशन के उपर कितना खर्च होता है इसका आकलन किये और पायलट बेसीस के उपर टिचर्स को अपॉइंट किये, हमारे शहर मे पढाने वालो की कमी नही है। मा.महापौरजी।

श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, इन्होने जो कहा की हम एज्युकेशन टॅक्स लेते है वह महानगरपालिका का टॅक्स है की गर्व्हनमेंट का टॅक्स है। वह अपने खाते मे जमा होता की कहा होता।

महापौर :— एज्युकेशन टॅक्स हा शासनाकडे जमा होतो.

श्री.सुनिल अग्रवाल :— मा.महापौरजी, इसलिये मेरा कहना है की जो प्रश्न उन्होने रखा थोडासा गलत था। और हमारे सदस्य श्री.मनोज सांगोळेजींने कहा की उनके स्कुल का उनमे सिलेक्शन क्यौ न हुवा तो महानगरपालिका को सिलेक्शन करने का हक है क्या?

श्री.जितेंद्र घोडेस्वार :— मा.महापौरजी, राईट टु एज्युकेशन अंतर्गत हा मुलभुत अधिकार का प्रश्न है। सभागृह के अंदर अभी जो नगरसेवक और नगरसेविका है यह सारे उसके भुक्तभोगी है। राईट टु एज्युकेशन संवेधानिक अधिकार है इसलिये उसके अंतर्गत महानगरपालिका का प्रश्न हो, स्टेट का प्रश्न हो, या सेंट्रल का प्रश्न हो, यह संवेधानिक प्रश्न है और यह संवेधानिक अधिकार कलम 21 (1) के अंतर्गत अधिकार मिला है इस अधिकार का और 21 (1) के अंतर्गत जो मुलभुत अधिकार दिये है और जो मुलभुत अधिकार का जो हमारे सन्माननिय अधिकारीयोंने इसका विश्लेषण करना चाहियें। राईट टु ऐज्युकेशन किन वर्गो के लिये किस तरीके का दर्जा दिया जाता है। 1991 के बाद इस देश के अंतर्गत ऐज्युकेशन के सत्र मे रहो या ग्लोबलायझेशन के अंदर जो सारी बाते आ रही है लेकीन महानगरपालिकेका दर्जा 1991 के बाद मे प्रायव्हेटाझेशन मे बढ रहा है और एज्युकेशन का दर्जा गिरते जा रहा है इसके पिछे का वजह और कारण इन दोनो का तुलणात्मक अभ्यास किया जाये। इसका प्रशासन ने उत्तर देना चाहियें। यह स्कुल का विषय नही है यह नागपूर शहर मे जितने भी संस्था चल रही हैं राईट टु एज्युकेशन के आधार पर नागपूर महानगरपालिका के प्रशासन ने महानगरपालिका के एज्युकेशन स्तर के बारे मे गव्हर्नमेंट की प्रायव्हेट शाला इंग्लीश स्कुले इस शहर मे चल रही हैं, उनका दर्जा और महानगरपालिका का दर्जा क्यौ नही बढा

जा रहा है। (बेल)
महापौर :– शाळेचा आता शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा विषय आहे त्यावर चर्चा करा त्यामध्ये 17 पॉइंट दिलेले आहे त्या शिवाय आपण 5 शाळा सी.बी.एस.सी. साठी केंद्रीय विद्यालयासाठी परमीशन मिळण्यासाठी प्रपोजल पाठविले आहे आणि त्याकरिता आपला प्रयत्न चालु आहे.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, एका प्रश्नासाठी आपण किती वेळ निर्धारीत केला आहे आणि किती उपप्रश्न आपण विचारु शकतो याची स्पष्टता असली पाहिजे. एका तासात 10 प्रश्न आपण घेणार आहेत काय

महापौर :– प्रत्येक मा.सदस्यांना बोलण्याकरिता 6 मिनीट आहे आपल्याला एका तासात 10 प्रश्न घ्यायचे आहे.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, एका प्रश्नाला 1 तास दया माझी काही हरकत नाही.

महापौर :– मा.सदस्यांना लिखीत स्वरुपात उत्तर दिलेले आहे.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, मेरा एक सुझाव है ऐज्युकेशन का स्तर बढाने के लिये अगर हमको पहल करनी है तो हमे टिचींग स्टाफ मे फेरबदल करना पडेंगा उसके लिये जिस तरीके से नागपूर महानगरपालिका ने परिवहन समिती का बजेट अलग से रखा है। अगर आप सही मानोंगे तो एज्युकेशन को बढावा देना चाहते है तो नागपूर महानगरपालिकाने शिक्षण विभाग का बजट भी अलग से करना चाहिंये। और शिक्षण के बजट के अंतर्गत प्रायव्हेट बसीस के उपर अलग से टीचरों की भरती कर के बच्चों के एज्युकेशन मे सुधार लाने का प्रयत्न हमारे तरफ से होना चाहियें ऐंसा आप रुलिंग दिजीए क्यौकी आने वालों दिनो मे हमारे बच्चे प्रायव्हेट स्कुलों मे ना जाते हुये हमारी महानगरपालिका के स्कुलों मे आयें और हमारे स्कुलो का ऐज्युकेशन का स्तर बढे और जो डिजीटल इंडीया का सपना वह सही मायनो मे साकार हो जायें।

महापौर :– या प्रश्नाच्या संदर्भात मा.सदस्य श्री मो.जमाल यांनी अतिशय उत्तम सुचना दिलेल्या आहेत.शाळेचा दर्जा उंचावणे गरजेचे आहे. त्याचा प्रशासनाने गंभीरपणे विचार करून अंमलात आणावे.

**<u>प्रश्न क्र 47</u>**:– हॉटमिक्स ने ड्रायव्हर मागितल्यानंतर ही सामान्य प्रशासन विभाग हॉटमिक्सला 4व्ही ड्रायव्हर टिप्परसाठी देत नाही. या संदर्भात प्रश्न

श्री.रविंद्र भोयर :– मा.महापौरजी, हॉटमिक्स प्लान्टच्या संदर्भातला माझा प्रश्न होता त्यातला माझा पहिला प्रश्न होता तेव्हा मी माझे पत्र तत्कालीन अधिकाऱ्यांना दिले होते त्या वेळेस मी म्हटले होते की आपला हॉटमिक्स प्लॉन्ट सुरु केव्हा होतो, आपला हॉटमिक्स प्लॉन्ट सुरु होतो मग सुरु करतांना त्यावर लागणारी ड्रायव्हरची नियुक्ती ही केव्हा आपण करायला पाहिजे, तहान लागल्यावर जर विहीर खोदण्याचे प्रकार जर विभागाकडुन होत गेले तर या हॉटमिक्स प्लॉटकडुन रस्त्यांचे कामाच्या दृष्टीने काही न्यायपुर्वक काम होईल असे मला वाटत नाही. मा. महापौरजी, हॉटमिक्स प्लॉटला आपण साधारणतः दसऱ्याच्या नंतर आपण सुरुवात करतो आणि दसऱ्याच्या नंतर जर आपण सुरुवात करीत असेल तर त्या वाहनांवर जे ड्रायव्हर लागणार आहे त्याची जर आपण दसऱ्यानंतर नियुक्ती करणार असेल तर आम्हाला 4 ड्रायव्हर लागणार आहे म्हणुन म्हणुन तत्कालीन सर्व अधिकाऱ्यांना आम्ही सुचना केल्या व त्यावेळेस त्यांनी सांगितले की आम्ही तुमच्या प्रभागातील रस्ता जो स्थायी समितीने हॉटमिक्सला दिला होता तो हॉटमिक्सच्या माध्यमातुन आम्ही पुर्ण करु शकणार नाही. त्यावेळेस मग आम्ही मा.स्थायी समिती अध्यक्षांना सुचना केली आणि त्या सुचनेनंतर पुन्हा आम्हाला कळविण्यात आले की हॉटमिक्सच्या माध्यमातुनच तुमच्या प्रभागातील रस्ते होईल. आता सर्वात मोठा विषय असा आहे की या हॉटमिक्सने गेले 35 ते 40 वर्षापासुन महानगरपालिकेमध्ये हॉटमिक्सच्या माध्यमातुन रस्त्यांची कामे होतात. त्याच्यामध्ये जी नविन उपकरणे लावायला पाहिजे ती उपकरणे सुध्दा आम्ही सर्वानी लावली, परंतु त्याचा इफेक्ट काय आहे. हॉटमिक्स वर काम करणारे अधिकारी जर या प्रश्नांचे उत्तर देवु शकतील की दर वर्षालाआम्ही हॉटमिक्सच्या माध्यमातुन महानगरपालिकेच्या डांबरीकरणाचे ऐवढया कोटी रुपयांचे आम्ही कामे करतो मा.महापौरजी, या शहरामध्ये दुसरी संस्था होती, मी या साठी म्हणत आहे की काही दिवसानंतर ती राहणार नाही. नागपूर सुधार प्रन्यासमध्ये सुध्दा हॉटमिक्सने रस्ते करण्याची परंपरा आहे आणि नागपूर सुधार प्रन्यास दर वर्षाला 40 कोटी रुपयांचे रस्त्यांची कामे त्यांच्या हॉटमिक्सव्दारे करीत असते माझा मुळात प्रश्न असा आहे की महानगरपालिकेकडे हॉटमिक्सची व्यवस्था असतांना महानगरपालिकेच्या हॉटमिक्स विभागाकडुन किती रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास आम्ही करण्यास सफल होतो, दर वर्षाला किती रुपयांचे हॉटमिक्स विभाग रत्यांचे काम करतात यावर प्रशासनाने उत्तर दयायला पाहिजे.

श्री.सतीश होले :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, या प्रश्नामध्ये सातत्याने लिहीले आहे की ड्रायव्हर नसल्यामुळे हॉटमिक्स प्लॉन्ट सुरु होत नाही. आणि एकीकडे आपण हॉटमिक्सच्या माध्यमातुन नगरसेवकांच्या

प्रभागाचे कामे होण्यासंदर्भात आमच्या फाईली त्यांच्याकडे पाठवितात. आपल्या हॉटमिक्समध्ये कुठल्याही प्रकारची ताकद नाही, आपल्याकडे मशीनरी नाही, मॅनपावर नाही, आणि तरी आपण हॉटमिक्स कडे आमच्या फाईल का पाठवितात असा आमचा निगडीत प्रश्न आहे त्यामुळे आमच्या प्रश्नाचे उत्तर देणे अपेक्षित आहे आणि ते हॉटमिक्स विभागाच्या माध्यमातुन दिले पाहिजे.

महापौर :— प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.महापौरजी, महानगरपालिकेचे खड्डे दुरुस्तीचे कामे हॉटमिक्स विभागाकडुन केली जाते. हा प्रश्न जेव्हा उपस्थित झाला अनेक प्रभागाच्या फाईल रस्त्यांची दुरस्ती करण्याकरिता हॉटमिक्स विभागाकडे यायला लागल्या त्या वेळेस इतक्या फाईल आल्या की आपल्या हॉटमिक्स प्लांन्टची क्षमता फक्त खड्डे बुजविण्यासाठी होती त्यातल्या त्यात आपल्या टिप्पर वरचे ड्रायव्हर नव्हते.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मला असे वाटते की मा. स्थायी समिती अध्यक्ष श्री.रमेश सिंगारे असतांना आपण एक बॅचमिक्स प्लॅन्ट घ्यावा अशी एक सुचना होती. त्यामागचे टेन्डर मला वाटते की ते स्थायी समितीकडे आले होते त्या संबंधाने सुध्दा माहिती दयावी याचे कारण असे की, हॉटमिक्स ला रिप्लेस करुन बॅचमिक्स प्लान्ट घेतला असता तर क्वॉलिटी पण सुंदर झाली असती, क्वॉन्टीटीच्या रुपात खुप जास्त काम झाले असते, आणि महानगरपालिकेचे रस्ते महानगरपालिकेच्या माध्यमातुन चांगल्या दर्जाचे झाले असते या करिता मा.दयाशंकरजी, श्री. रमेश सिंगारे, श्री.अविनाश ठाकरे, श्री.बंडु राऊत पासुन त्या बॅचमिक्स प्लॅन्टची मागणी होती. त्या संदर्भात काय झाले त्या संदर्भात माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.महापौरजी, बॅचमिक्स प्लांन्ट खरेदी करण्यासंबंधीचा आपला प्रस्ताव होता तो स्थायी समितीकडे आला होता, मंजुरही झाला होता तो 14 कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. तेवढा पैसा आज रोजी आपल्याकडे एक रक्कमी उपलब्ध नव्हता.

श्री.सतिश होले :— मा.महापौरजी, सद्या हॉटमिक्स प्लांन्टची परिस्थिती काय आहे. आपल्याकडे किती स्टाफ आहे, किती गाडया आहे, बसण्याची परिस्थिती काय आहे आणि आपण किती प्रॉडॉक्ट काढु शकतात त्याची एक एक करुन माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.महापौरजी, सन 2007 मध्ये हॉटमिक्स प्लान्ट घेण्यात आला होता. त्याला 17 वर्ष पुर्ण झाले आहे त्याची कॅपॅसिटी त्याच्या वयोमानाने कमी झाली आहे.

श्री. सतिश होले :— मा.महापौरजी, किती टन माल पर डे आपण हॉटमिक्स व्दारे काढु शकतात

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.महापौरजी, त्याची स्टॅन्डर्ड कॅपिसिटी आहे 340 टन पर अवर त्या हिशोबाने तेवढे प्रॉडॉक्शन होवु शकत होते. आजच्या परिस्थितीमध्ये जवळपास 100 टन प्रॉडक्शन दिवस भरात होते. टिप्पर 9 आहे.

श्री.सतिश होले :— मा.महापौरजी, 1 टिप्परला किती टन माल जाते.

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.महापौरजी, एका टिप्पर ला 7 टन माल पाठविला जातो.

श्री.सतिश होले **:—** मा.महापौरजी, एन.आय.टी एका टिप्पर मार्फत 11 टन माल पाठविते. मा.महापौरजी, आपल्या हॉटमिक्स प्लॅन्टची कुठल्याही प्रकारची कॅपिसीटी नाही आहे. दिवसभ—यातुन व्यवस्थित काम केले तर 100 टन माल काढु शकतो आणि 100 टन मालामध्ये आपण गड्डे बजवु शकत नाही. जेव्हा आपण गडड़े बुजवू शकत नाही तर इतर रस्त्यांच्या फाईली आपण आपल्याकडे का घेता. जशा पी.डब्लु.डी. कडे फाईल जातात तशा का जात नाही. यांच्या कडे स्टाफ नाही जेव्हा यांच्याकडे फुलफिल स्टाफ राहील, जेव्हा यांच्याकडे इंस्ट्रुमेंट पुर्ण राहील, तेव्हा हे 100 टन माल काढु शकेल नाहीतर हे होणार नाही या विभागाची चौकशी केली पाहिजे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, हॉटमिक्स प्लांन्टनी गेल्या 7 महिन्यामध्ये किती ठिकाणी कार्यादेश झालेल्या डांबरीकरणाचे कामे केलेले आहे ती माहिती मला देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.भुतकर) :— मा.महापौरजी, हॉटमिक्स प्लांन्टची संपुर्ण क्षमता शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याकरिता लागलेली आहे, त्यामुळे नविन कोणतेही कामे करण्यात आलेले नाही.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, गेल्या 7 ते 8 महिन्यापासुन नगरसेवकांच्या फाईलचे कार्यादेश झालेले आहे ते मागच्या रेजीमचे कार्यादेश आहे त्याचेही सुध्दा काम झालेले नाही म्हणजे हॉटमिक्स प्लान्ट हा अकार्यक्षम आहे म्हणुन हा हॉटमिक्स प्लान्ट बंद करुन ज्यांचे कार्यादेश झाले असेल त्यांचे काम ताबडतोब पुर्ण करावे.

श्री.नितीन साठवणे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, दिवाळी पुर्वी यांना माझ्या प्रभागाच्या मेन रोडचे

खड्डे बुजविण्यासंदर्भात वांरवार सुचना दिली मात्र तरीसुध्दा आज पर्यत ते खड्डे बुजविले नाही.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मा.आयुक्त येथे आहे हॉटमिक्स प्लॉन्टची कॅपॅसिटी संपली आहे. अधिकारी तर त्याहुन निष्क्रीय आहे. माझी आपल्या मार्फत आयुक्तांना विनंती आहे की बॅचमिक्स प्लॅन्टच्या बाबतीत त्यांनी येथे स्पष्टीकरण दयावे. माझी तर याच्या मागची वेगळी शंका आहे. जर बॅचमिक्स प्लॅन्ट आपण आणला आणि लावला आणि चांगल्या क्वॉलिटीची वस्तु वापरुन जर आपण रस्ते निट केले तर जे टेन्डर होतात आणि कंत्राटदाराला जातात आणि तेथे अबव्ह टेन्डर जाण्याचा अनेक वर्षापासुनचा अनुभव आहे ते लंबे होईल आणि आपल्या मार्फत आपल्या नगरसेवकांच्या प्रभागातील रस्ते निट होतील हा या मागचा हेतु होता. आता मा.महापौरजी, आम्ही सगळे नगरसेवक आहोत लक्ष्मीनगर झोन कधी आपल्या वार्ड विकास निधीतुन टिप्पर घेतात, गांधीबाग झोन आपल्या वार्ड विकास निधीतुन जे.सी.बी. घेतो, कोणी मशीन घेते, आपण जर विनंती केली तर आम्ही सगळे नगरसेवक यातही आपले कॉट्रीब्युशन देवु शकतो अशी माझी सभागृहाला विनंती आहे. जे देवु शकतील ते देतील आणि जे नाही देवु शकतील ते नाही देणार पण हा जर प्लॉन्ट आणला तर हा लॉग टाईम आपल्या महानगरसाठी आपल्या रस्त्यांसाठी, आपल्या भविष्यासाठी हा उत्तम आहे आणि महानगरपालिकेच्या माध्यमातुन चांगले रस्ते होतील म्हणुन आपण मा. आयुक्तांना सांगावे व त्यांनी याबाबत स्पष्टीकरण दयावे. कारण स्थायी समितीने त्या विषयाला मंजुरी दिली आहे 14 कोटी रुपयांचा प्रश्न आहे आणि या शहराच्या विकासासाठी आपण ते करु शकतो.

महापौर :— आयुक्तांनी या संदर्भात अभ्यास करुन समस्यांचे निराकरण करण्यात यावे.

श्री. सतीश होले :— मा.महापौरजी, जेट पॅचर कशासाठी आपल्या शहरात सुरु आहे.

महापौर :— शहरातील खड्डे बुजविणेही आवश्यक आहे मात्र बॅचमिक्स प्लॉटच्या संदर्भात आयुक्तांनी संपुर्ण अभ्यास करावा. बॅचमिक्स प्लॉन्ट सोयीस्कर होत असेल हे शहराच्या दृष्टीने चांगले होईल. आयुक्त स्वःत याच्यात लक्ष घालतील. बॅचमिक्स प्लॉन्ट संदर्भात सर्व बाबींचा अभ्यास करून एक महिन्याच्या आंत त्याच्यावर निर्णय घेतील.

श्री.रविंद्र भोयर :— मा.महापौरजी, आमच्या प्रभागातील डांबरीकरणाच्या सर्व फाईल हॉटमिक्सकडे दिलेले आहे आणि जे हॉटमिक्स या शहरातील गड्डे बुजवु शकत नाही ते माझ्या प्रभागातील रस्ते कसे करणार जर यांनी ते रस्ते नाही केले तर माझ्या प्रभागाच्या रस्त्यांचे काय होणार हा गंभीर प्रश्न माझ्या समोर उभा आहे. त्यामुळे या हॉटमिक्सचे बॅचमिक्स करायचे की काय करायचे यावर निर्णय मा.आयुक्तांनी त्वरीत घ्यावा. आणि या शहरातील रस्त्यांची क्वॉलिटी सुधरविण्याच्या दृष्टीकोणातुन आणि आमच्या फाईल कशा पध्दतीने कसे पुर्ण होईल त्या दृष्टीकोणातुन त्वरीत निर्णय घ्यावा.

महापौर :— आयुक्त या प्रकरणात स्वतः लक्ष घालुन त्वरीत कारवाई करावी.

**<u>प्रश्न क्र 48</u>**:— मे. सायबरटेक कंपनीला सर्वेक्षणाचे काम केव्हा दिले होते ? या संदर्भांत प्रश्न.

श्री. प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मला या संदर्भात प्रशासनाकडुन उत्तर प्राप्त झालेले आहे. या आधी जेवढे प्रश्न उपस्थित झाले त्यामध्ये प्रश्न कमी आणि भाषणे जास्त होते. मा.महापौरजी यातला माझा पहिला उपप्रश्न असा आहे की सायबर टेकला जे काम देण्यात आले आहे मालमत्ता सर्वेक्षणाचे त्या सर्वेक्षणाच्या कामामध्ये कशा कशाचा समावेश आहे याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

महापौर :— प्रशासनाने माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौर महोदय, आदरणीय सभागृह, सायबर टेकला कार्यादेश क्र.211 दि 7/11/2015 ला काम दिले आहे. नागपूर शहरातील जेवढया काही जमिनी व इमारती आहे त्या जमिनीचा आणि नागपूर महानगरपालिकेच्या जेवढे रेव्हेन्युशी संबंधित डिपार्टमेंट आहे त्या रेव्हेन्यु डिपार्टकरिता आवश्यक डाटा कलेक्ट करण्याकरिता काम दिले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, डाटामध्ये कशा कशाचा समावेश आहे समजा एखाद्यी इमारत आहे त्यांचे बांधकाम क्षेत्रफळ किंवा करमुल्य क्षेत्रफळ त्यामध्ये आपण निर्धारीत करतो काय?

सहा. आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौर महोदय, आता जवळपास 80 पॅरामीटर आहे त्यांचे डाटा कलेक्ट करायचे आहे त्यातील मेन जो पॅरामीटर आहे प्रॉपर्टी टॅक्स डिपार्टमेंटशी संबंधित आहे की ज्याचे ठराव क्र 72 नुसार कर मुल्य ठरविण्याकरिता प्रॉपर्टीचे पॅरामीटर आवश्यक आहे

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, आपल्या कायद्यामध्ये स्पष्ट तरतुद आहे एखादया बांधकामाचे करयोग्य क्षेत्रफळ कसे निश्चित करायचे आपण ते निश्चित करण्याची पध्दती काय आहे ते समजुन सांगावे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौर महोदय, प्लींथ ऐरिया मेजर करतो आणि तो प्लींथ ऐरिया मेझर

झाल्यानंतर त्याला स्टॅन्डर्ड डिडक्शन देवुन जो नेट ऐरिया आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, आपल्या कायद्यामध्ये कुठे 10 टक्क्यांची कुठे तरतुद आहे हे समजुन सांगावे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौर महोदय 10 टक्क्यांची जरी तरतुद नसेल तरी तिथल्या ज्या ॲमिनीटीज आहे जसे लॅट्रीन आहे, कॉमन ऐरिया आहे, स्टेअर केस आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– कायद्यामध्ये काय तरतुद आहे याचे वाचन करावे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौर महोदय, आपला जो टॅक्सेबल जो ऐरिया आहे म्हणजे जो कॉमन ऐरिया वगळुन जो ऐरिया येतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, कायद्यामध्ये स्पष्ट तरतुद आहे की तो कर योग्य क्षेत्रफळ किती आहे याचे निश्चिती करत असतांना जो बांधीव क्षेत्र ज्या मधुन जिना, टॉयलेट बाथरुम, बाल्कनी, व्हरांडा, सर्व वगळल्या जाते. सर्व्हे करीत असतांना पुर्ण सुविधा क्षेत्रातुन 10 टक्के वजा करीत आहे. त्यामुळे या शहरातील जनतेवर अतिरिक्त करांचा भुर्दंड बसत आहे. आपला करयोग्य जे क्षेत्रफळ आहे ते साधारतणतः 60 ते 70 टक्क्यांपर्यत येते तर आपण जो कर आहे 90 टक्क्यांपर्यतच्या बांधकाम क्षेत्राफळावर लावत आहे म्हणुन मा.महापौरजी, पुर्णतः ती पध्दती चुकीची आहे. त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे आदेश दयावे. ज्या ठराव क्र 72 चा उल्लेख या ठिकाणी करीत आहे त्या ठराव क्र. 72 चा एक पार्ट मा.महापौरजी, सन्माननिय दटके साहेबांच्या सुचनेनुसार आपण वगळलेला आहे. त्या ठराव क्र 72 मध्ये 1/4/15 पासुन आपण पुर्नमुल्यांकनाप्रमाणे कर आकारणी करावी असा ठराव केला होता. त्याचा एक पार्ट आपण रद्द केला त्याच ठरावाचा दुसरा पार्ट आहे जी कर आकारणी करायची आहे त्या क्षेत्रफळातुन 10 टक्के सुविधा क्षेत्र आपण वगळण्यात यावे आता 10 टक्के सुविधा क्षेत्राचा कायद्यामध्ये कुठेही उल्लेख नाही. ते क्षेत्रफळ कसे स्पष्ट करावा याचा उल्लेख आहे ते 10 टक्के यांनी आपल्या मर्जीने आणले आहे. या शहरातील जनतेवर अतिरिक्त कराचा भुर्दंड व्हावा या दृष्टीकोणातुन ते 10 टक्के क्षेत्रफळ मायनस करीत आहे. म्हणुन त्यामध्ये बदल करावा आणि कर योग्य क्षेत्रफळ निश्चित करायचे आहे ते कायद्याप्रमाणे करावे, ज्यामध्ये बाल्कनी, कव्हर बाल्कनी असेल त्याचा समावेश करावा, टॉयलेस्ट् आधीच्या काळामध्ये सिंगल टॉयलेटस् एका युनिट मध्ये राहत होते आता दोन–दोन, तिन–तिन टॉयलेट राहतात त्या मधून टॉयलेट मायनस होईल, जिना मायनस होईल, त्या सुविधा संपुर्ण मायनस केल्यानंतर जे निव्वळ करयोग्य क्षेत्र आहे त्याप्रमाणे याचे पुर्नमुल्यांकन करावे.

सहा. आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौर महोदय, 10 टक्के वजा करण्याचा जो मुद्या आहे तो ठराव क्र. 72 पास करतांना सभागृहाने तो निर्णय घेतलेला आहे तो प्रशासनाने घेतलेला नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, ठराव क्र 72 मध्ये याच सभागृहाने एक ठराव केला होता 1.04.2015 पासुन आपण रिवाईज कर झाला पाहिजे याच सभागृहाने तो रद्द पण केला मा.महापौरजी, या चर्चेचा अनुषंगाने माझी विनंती आहे या सभागृहाला की आपण तो 10 टक्के रद्द करावा आणि कायद्यामध्ये जे अंतर्भुत आहे त्याप्रमाणे करयोग्य क्षेत्र निश्चित करावे, अशी माझी सभागृहाला विनंती आहे. तसे आदेश मा.महापौरजी आपण प्रशासनाला दयावे. दुसरा जो प्रश्न आहे माझ्या एका प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दिले की दि. 17/11/2017 पर्यत 4 लाख 95 हजार 946 मालमत्ता युनिट ब्रॅकेटमध्ये दिले आहे 3,11,288 मालमत्ता ही तफावत मला कळली नाही. युनिट आणि मालमत्ता मध्ये काय फरक आहे ?

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौर महोदय, युनिटची व्याख्या आपली जी मार्गदर्शक पुस्तीका काढण्यात आली आहे त्यामध्ये युनिटची व्याख्या दिली आहे. युनिट म्हणजे इमारत किंवा इमारतीचा भाग जे स्वतंत्रपणे भाडयाने देण्याऐवजी असेल एका कुटुंबाच्या वापरातील घर किंवा घराचा भाग एक स्वतंत्र युनिट समजण्यात येते. एखादया कुंटुंबातील व्यक्ती वेगवेगळे राहत असतील व त्यांची स्वयंपाक करण्याची व्यवस्था वेगळी असेल अशा प्रत्येक भागाला एक स्वतंत्र युनिट समजुन त्याची वेगवेगळी कर आकारणी करण्यात येते. समजा एखाद्या घराचा काही भाग निवासी व काही भाग अनिवासी असेल तर अशा दोन्ही संकुलातील घरांची कर आकारणी वेगवेगळी पध्दतीने करण्यात येते. फ्लॅटमधील प्रत्येक गाळेधारकाला वेगवेगळे युनिट नुसार कर आकारणी करण्यात येते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सहा.आयुक्तांनी कशाचे वाचन केले आहे ते सांगावे

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौर महोदय, ती एक मार्गदर्शक पुस्तीका आहे त्यामध्ये युनिटची व्याख्या स्पष्ट केली आहे.

श्री.प्रफुल्ल गुधडे :— मा.महापौरजी, ती मार्गदर्शक पुस्तीका आपण कायद्याच्या अनुषंगाने बनविलेली असेल

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौर महोदय, कायद्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र गर्व्हनमेंटनी ज्या बायलॉजला जी मंजुरी दिली होती त्या बॉयलॉजमध्ये पण युनिटची व्याख्या मंजुर केली आहे. नियम क्र 11 मध्ये (इंग्रजीमध्ये वाचले)

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, बॉयलॉज मध्ये जी युनिटची व्याख्या दिलेली आहे त्याचे वाचन मी मराठी मधुन करुन दाखवितो. कोणतेही इमारत किंवा जमिन दोन किंवा अधिक व्यक्तींना धारण करण्यासाठी भाडयाने देण्यात आली असेल तेव्हा आयुक्तांस अशा इमारती किंवा जमिनीवर मालमत्ता आकारणी करण्याच्या प्रयोजनासाठी ती संपुर्ण एकच मालमत्ता आहे असे समजण्यात यावी. मा.महापौरजी, अत्यंत स्पष्ट तरतुद आहे की एखादे घर आहे आणि त्यामध्ये चार खोल्या आहे त्या चार खोल्यापैकी समजा जर दोन खोल्या किरायाने दिल्या असेल ते एक युनिट आहे की दोन युनिट आहे त्यामध्ये मालक एकच आहे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, दोन युनिट

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, नियम क्र 11 मध्ये एकच मालमत्ता आहे असे समजण्यात यावे आता मालमत्ताला इंग्रजीमध्ये काय म्हणतात ते मला माहिती नाही.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, कुटुंबातील दोन व्यक्ती जर वापरत असतील आणि स्वयंपाक करण्याची किचन रुम जर वेगवेगळी असतील.

श्री. प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, अशा जमिन मालकांच्या लेखी संम्मतीने किंवा दोन किंवा अधिक पृथकधारक जमिनी किंवा प्रत्येक फ्लॅट स्वतंत्र मालमत्ता आहे असे समजण्यात येते. ज्या ठिकाणी लेखी परवानगी घ्यावी लागेल त्या मालमत्ता धारकांची महानगरपालिका स्वतः सुमोटो स्वतंत्र आहे आपल्याला बेनिफीट मिळविण्यासाठी स्वतंत्र जर मालमत्ता करीत असु तर तर ही चुकीची पध्दती आहे. या मध्ये सुधारणा व्हावी. कारण वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या येत आहे की त्यामध्ये युनिटची संख्या वाढविण्यासाठी एक नविन शंका आहे. आता युनिटची संख्या का वाढली आहे तर एखादया इमारतीमध्ये एकाच घरमालक एक भाग रहिवासी आणि एक भाग वानिज्यीक वापरासाठी असेल तर जे युनिट आहे जर तो घरमालक स्वतंत्रपणे जर लेखी परवानगी देत असेल तर आपण त्याला दोन विभीन्न वेगळे युनिट ठरविले पाहिजे. मात्र महानगरपालिकेने या सर्वेक्षणामध्ये त्यामध्ये युनिटची संख्या वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन त्याला स्वतंत्र युनिट म्हटलेले आहे. त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जे सुचविले आहे त्यांनी लेखी संम्मती देण्यासाठी त्यांना 8 दिवसाचा वेळ देतो आहे की त्यांनी डिक्लेरेशन दयावे आम्ही जो डाटा कलेक्ट करतो.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, जर समजा घरमालकांनी डिक्लेरेशन केले नाही तर काय ?

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, जो आम्ही डाटा कलेक्ट केला.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, कायद्यामध्ये तरतुद एकदम स्पष्ट आहे जर त्यांनी लेखी संम्मती दिली नाही तर एकच युनिट समजण्यात यावे हे स्पष्ट आहे, कायद्यामध्ये त्याचे वेगळे इंटरप्रिटेशन करण्याची गरज नाही. आपण नोटीस दिल्यानंतर किती लोक नोटीसीचे उत्तर देतात मा.महापौरजी, कोणीच देत नाही. किती लोक डाटा भरुन देतात मा.महापौरजी कोणी देत नाही. जर त्यांनी डाटा भरुन दिला नाही तर त्याची लेखी संम्मती नाही असा त्याचा अर्थ होतो, त्यामुळे त्याची लेखी संम्मती गृहित धरुन दोन सेपरेट युनिट असे ठरवित असू तर मा.महापौरजी हे चुकीचे आहे. चुकीच्या पध्दतीने त्याचे इंटरप्रिटेशन होत आहे त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी आणि ते युनिट एकच समजण्यात यावे त्याची लेखी संम्मती असेल तर ते स्वतंत्र युनिट समजण्यात यावे आणि जो क्षेत्रफळ आहे ते निश्चित करीत असतांना 10 टक्केंचा जो ठराव झालेला आहे तो रद्द करुन त्यामध्ये कायद्या प्रमाणे जे समाविष्ट असेल त्यामध्ये आपण कर योग्य क्षेत्रफळ निश्चित करावे असा ठराव या सभागृहाला संमत करावा अशी विनंती मी आपल्या माध्यमातुन प्रशासनाला करतो.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, जेव्हा सायबर टेक सिस्टीमला काम दिले होते स्थायी समितीमध्ये ठराव क्र. 162 नुसार त्यांना काम दिले होते आणि वर्कऑर्डर होता त्यांचा 6/11/2015 चा आणि त्याच्यामध्ये जी परीभाषा होती की एक युनिट म्हणजे एक घर आता जसे सांगितले की दोन भाऊ जर एका घरात वेगवेगळे राहत असेल तर दोन युनिट हा त्यातला भाग नाही कारण की माझा एक आरोप असा आहे की, त्या सायबर टेक कंपनीला आपण फायदा पोहचविण्याकरिता नविन काहीतरी आपण आणलेले आहे. की मागे स्थायी समिती मध्ये एक विषय आणलेला होता 7.7.2017 ला तो विषय काय होता तर त्या विषयामध्ये असा होता की

आम्ही प्रत्येक युनिटच्या मागे मिळकत दाराने आम्ही त्यांना भुगदान करीत आहोत आणि विषय आणतांना त्यांनी सांगितले की प्रिटींग मिसटेक होती तर त्यांना फायदा पोहचविण्याकरिता नविन विषय स्थायी समितीमध्ये आणला आणि कारण हे सांगितले की ते चुकीने झाले मग ते जर चुकीने झाले असेल तर त्यांना ते जे दोन भुगदान केले, पहिले भुगदान त्यांनी केले देय क्रमांक डी.एच.ए. 031/016/ एन.एम.सी. दिनांक 25.10.2016 ला 36 लाख 72 हजार केले. दुसरे भुगदान केले त्यांनी दि. 07/2/2017 ला केले म्हणजे स्थायी समितीच्या मिटींगच्या अगोदर जेव्हा आपण त्यांना भुगदान करीत आहे तो एका घरामागे एक युनिट म्हणुन भुगदान करतो आणि याच्या आधी एक घर म्हणजे एक युनिट असे भुगदान केले आता त्यांना फायदा पोहचविण्यासाठी एका घराच्या मागे दोन युनिट करीत आहोत जर दोन भाऊ वेगळे असतील तर हा कंपनीला फायदा पोहचविण्यासाठी करण्यात आला असा माझा आरोप आहे याचे उत्तर मला देण्यात यावे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, या कामाचे जेव्हा आर.एफ.पी. डॉक्युमेंट बनविण्यात आले तेव्हा व्ही.एन.आय.टी. कडुन किंवा स्टॅडींग कॉन्सील कडुन अप्रव्हल घेतले आहे. व्ही.एन.आय.टी. च्या मार्फेत हे डॉक्युमेंट तयार केले आहे. आणि त्या आर.एफ.पी. च्या डॉक्युमेंटस् मध्ये फायनन्सीयल बिडचा की त्यांनी काय रेट कोड करायला पाहिजे जो पार्ट आहे त्यात रेट मागितला आहे पर बिल्डींग युनिटचा रेट मागितला आहे पर प्रॉपर्टीचा रेट मागितलेला नाही. त्यानंतर आर.आफ.पी. 3.2 मध्ये जो उल्लेख केलेला आहे इंडीव्हीजुअल टेनामेंटस्, हाउस युनिट, या करिता डाटा कलेक्ट करायचा आहे. आणि बी.ओ.टी. वर सुध्दा त्याच करिता रेट मागवत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, सहा.आयुक्त श्री.मेश्राम साहेबांचे जे म्हणणे आहे ते टेन्डर करीत असतांना संपुर्ण कायद्यातील तरतुदीचे पालन करुन टाकणे गरजेचे आहे. एखाद्या मालमत्तेचे डिक्लेरेशन निश्चित केले आहे त्याचा प्रॉपर्टी ओनर कोण आहे की ज्यांची आखीव पत्रिका आहे शासनाचा जी.आर. आहे त्याच्यामध्ये जर एखाद्या माणसांनी त्याच्यावर एकापेक्षा अधिक युनिट बांधलेली असतील आणि तो एकटयाचा वापराचा असेल आणि एकापेक्षा अधिकच्या वापरामध्ये जर असेल आणि सिटी सर्व्हेमध्ये म्युटेशन झाले असेल तर ते सेपरेट युनिट झाले म्युटेशन झाले नसेल तर ती मालमत्ता आणि प्रॉपर्टी एकच आहे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी,ओनर जर वापरत असेल तर त्याला आम्ही एकच युनिट पकडतो त्याला 3 युनिट पकडत नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— समजा किरायदार वापरत असेल तर

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, किरायदार जर वापरत असेल तर त्याला दोन युनिट पकडतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, जर येथे त्याची लेखी संम्मती असेल तर त्याला दोन युनिट

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, माझ्या घरी किरायदार आहे म्हणुन लेखी संम्मती दयायला तयारच होत नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, ते लेखी संम्मती नाही देत तर यामध्ये महानगरपालिकेचा काय फायदा आहे ते मला सांगण्यात यावे. समजा जर युनिट एक राहीले किंवा दोन राहीले त्याच्यात महानगरपालिकेचा काय फायदा उलट महानगरपालिकेचे दोन वेगवेगळे केल्यामुळे नुकसान होत आहे आणि 120 रु जास्त दयावे लागत आहे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, जर ते किरायाने दिलेले युनिट असेल तर कर योग्य मुल्य ठरविण्याकरिता जो ऑक्युपेंन्सी फॅक्टर आहे तो 3 आहे त्याने टॅक्स वाढेल.

प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, ते ऑक्युपेन्सी फॅक्टर करा परंतु जो घर मालक आहे त्याने जर लेखी संम्मती दिली तर तुम्ही वेगळा टॅक्स करु शकता नाहीतर नाही करु शकत. जर ते देत नसतील तर तुम्ही एकत्रित बिल मध्ये टाका की टेनन्ट आक्युपेंट, सेल्फ आक्युपेंट.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मी ज्या घरी राहतो खाली चार दुकाने आहे आणि वर घर आहे हे एक युनिट होईल की पाच युनिट होईल.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, जे कमर्शीअल वापरात आहे त्याला वेगळे युनिट कंन्सीडर करतो.

श्री.प्रविण दटके :— चार दुकानांचे चार युनिट की चार दुकानांचे एक युनिट

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, एक युनिट

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, हे पांच युनिट म्हणत आहे ते चुक आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, जर हे असे असेल तर हा शुध्द भ्रष्टाचार आहे. जे काही 122 रुपये आपण देतो आहे हे आपण आपल्या जनतेच्या करातुन देतो आहे याचे भान सगळयांना असले पाहिजे दुसरे एक प्रॉपर्टी माझ्या प्रॉपर्टीची आई सिंगल ओनर आहे एक घर आहे खाली चार दुकाने आहे तर माझे असे म्हणणे आहे ते एकच युनिट असले पाहिजे आणि याच्या आधी पण जी डिमांड मला यायची त्यामध्ये सेल्फ असेसमेंट करुन टॅक्स भरला आहे त्याचे पाच वेगवेगळे रकाने दाखविलेले आहे त्याची टोटल दिली आहे आणि टॅक्स पण मी भरला आहे. सद्या तो एकच युनिट आहे. त्यामध्ये जर घर वेगळे आणि चार दुकाने जर वेगळे असेल तर मा.महापौरजी मला असे वाटते की ते उचित नाही हे तपासुन घ्यावे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, जे आधी होते स्थायी समितीमध्ये दुरुस्ती करण्याकरिता हा विषय आला होता आधी जेव्हा सायबर टेक कंपनीला काम दिले त्यामध्ये एका घराच्या मागे एकच युनिट होते तेथे कमीर्शीअल असे काही नव्हते. ॲग्रीमेंट मध्ये असे लिहीले होते किती काम झाले त्याचे दर दोन महिन्याला स्थायी समितीला माहिती दयायची होती कितीदा त्यांनी माहिती दिली. स्थायी समितीला त्यांनी स्थायी समितीमध्ये आणुन हा विषय दुरुस्त केला आणि कारण काय सांगितले की मिस प्रिंट झाली.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, स्थायी समितीला जो प्रस्ताव आला होता तो मी वाचला होता. त्यात असे म्हटले होते की एक फ्लॅट स्कीम किंवा एक बिल्डींग मध्ये समजा चार फ्लॅट असतील तर चार युनिट होते ते मान्य आहे. समजा प्रफुल्ल गुडधे चे घर आहे ते एका घराचे रहीवासी आहे आणि त्यांच्याघरी दुकान असतील आणि त्यांनी जर ते किरायाने दिले असतील तर त्याचा युनिट एकच होईल दोन कसे होतील. एका घरी जर एक निवासी घर आणि चार दुकाने असतील तर ते युनिट एकच व्हायला पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, येथे प्रशासनाची भुमिका सभागृहाच्या मताशी अगदी विपरीत आहे. आमचे म्हणणे एकदम स्पष्ट आहे कायद्यामध्ये जी तरतुद आहे मा.सदस्य श्री.प्रविणजींने सांगितले की एक घर आहे आणि त्या घरामध्ये पाच दुकाने आहे तर युनिटची संख्या एकच होईल असे या सभागृहाचे मत आहे तसे दिशानिर्देश आपण प्रशासनाला आपण दयावे आणि त्या युनिट संख्येच्या अनुषंगानेच कर आकारणी करावी, आणि त्या सायबर टेक कंपनीला त्या प्रमाणेच पैसे अदा करण्यात यावे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या विषयावर अत्यंत अभ्यासपुर्ण चर्चा झालेली आहे या विषयाची तपासणी करण्याकरिता किंवा या विषयाचे काय केले पाहिजे जे 3 ते 4 मुद्दे श्री.प्रफुल्लजी गुडधे, श्री.संदीप सहारे, श्री. प्रविणजी दटके या ठिकाणी ठेवले त्याच्याबद्दल स्थायी समितीने विचारपुर्वक हा विषय सभागृहामध्ये पुन्हा पाठविण्यात यावा. अशी मी आपल्याला विनंती करतो

महापौर :— सन्माननिय सत्तापक्ष नेता यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**<u>प्रश्न क्र 49</u>**:— महानगरपालिका 2012 अधिनियमामध्ये अवैध इमारत अनाधिकृत इमारतीच्या बांधकामा संदर्भात असलेले कोणते नियम आहेत. (अ) अनधिकृत इमारतीच्या बांधकामावर शास्ती लावण्याचे अधिकार मनपाला केव्हा प्रात झाले? संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्तः— वितरीत केल्याप्रमाणे

**<u>प्रश्न क्र 50</u>** :— नागपूर महानगरपालिकेमध्ये रिटायरमेंट झालेले किती अधिकारी मनपा मध्ये कोण कोणत्या विभागात घेण्यात आले? संदर्भात प्रश्न

श्री. नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, मी विषय टाकला होता की आपल्या महानगरपालिकेमध्ये सेवानिवृत्त कर्मचारी किती घेण्यात आले त्या संदर्भात माहिती दिलेली आहे परंतु या माहितीमध्ये स्टेनो कम टायपिस्ट लिहीले आहे या पदाला कोणता अनुभव लागते. मला येथे सांगण्यात यावे के डेप्युटी इंजिनिअरचा टोटल पगार किती आहे.

सहा आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, ग्रेड पे 5400 आहे ग्रॉस पगार 75,000 आहे.

श्री. नरेंद्र बोरकर :— मा.महापौर, त्यांची पेंशन किती जाईल?

सहा.आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, पगारांच्या 50 टक्के म्हणजे 40 हजार रुपये पेंशन त्यांना मिळेल.

श्री.नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, इन लोगों को यहापर लिया है तो इनको पगार भी चाहियें और पेंशन भी चाहियें।

सहा आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, इस संदर्भ मे एक शासन निर्णय है। शासन निर्णय के

हिसाब से वो लोग जितना पेंशन लेते है उतना मायनस होता है। सपोज टोटल पगार 75000 मिलता था और पेंशन 40,000 है तो 35,000 से जादा उनको पगार नही मिल पायेंगा।

श्री.नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, जो लोग रिटायर्ड हुये तो रिटायरमेंन्ट की परीभाषा क्या है।

सहा.आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, वर्ग 1,2,3 मध्ये वयाच्या 58 व्या वर्षी रिटार्यमेंट होते आणि वर्ग 4 मध्ये वयाच्या 60 व्या वर्षी रिटार्यमेंट आहे.

श्री.नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, रिटायरमेंन्टची व्याख्या काय आहे. की सेवानिवृत्त का बरे करण्यात येते.

सहा.आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, विहीत वयोमर्यादा होने के बाद मे उनको सेवानिवृत्त किया जाता है।

श्री.नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, उनकी उमर हो जाती है इसलिये वह जाते है। नागपूर के जो बेरोजगार लोग है उनको काम करने के लिये बुलाओं ।

सहा.आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, या मध्ये आपण फायर डिपार्टमेंट मध्ये 26 जास्तीत जास्त सेवानिवृत्त कर्मचारी घेतले आहे.

श्री.नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, फायर विभागात फायरमन व ड्रायव्हर 26 घेतले आहे. ड्रायव्हर असल्यावर फायरमन ड्रायव्हर घेण्याची काय आवश्यकता?

सहा.आयुक्त सा.प्र.वि (श्री.धामेचा):— मा.महापौरजी, सेवानिवृत्त कर्मचारी घेण्यासाठी जी जाहिरात दिली होती त्यामध्ये फिजीकल स्टॅनर्ड चे निकष लिहलेले होते त्या मध्ये फिजीकल टेस्ट सुध्दा घेण्यात आलेली आहे.

श्री.नरेंद्र बोरकर :— मा.महापौरजी, हे आपल्या नागपूर शहराची आणि आपण जे नगरसेवक आहे. आणि आपण जनतेचे नगरसेवक आहोत म्हणुन मी जनतेच्या वतीने विनंती करतो की जेवढे लोक लागले आहे ते कमी करा आणि जे बेरोजगार लोक पडलेले आहे हा प्रश्न जनतेशी निगडीत प्रश्न आहे. आपणास विनंती आहे की आपण रुलिंग दयावे की जेवढे लोक लागले आहे. मी उदाहरण देवु इच्छितो की नागपूर महानगरपालिकेमध्ये यंग मुले लागले होते त्या लोकांना काढुन परत जुन्या लोकांना घेतले आणि चांगले जे.ई लोक होते काही ठिकाणी म्हातारे लोक आहे त्यामुळे आपण रुलिंग करावे आणि तेवढया अधिकाऱ्यांना आपण कमी करावे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, ज्या ठिकाणी अनुभवाची आवश्यकता आहे आणि बेरोजगारीचा प्रश्न देखील गंभीर होत चालला आहे आणि त्याच्यामुळे जेथे खरोखर आवश्यकता नाही अशा ठिकाणी तपासुन नविन तरुण पोर हे या ठिकाणी भरती करण्यात यावे.

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.नरेंद्र बोरकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अत्यंत चांगला आहे. अनुभवी म्हणाले ते बरोबर आहे परंतु इतका जास्त अनुभव नाही पाहिजे आता तुमच्या बाजुलाच आहे त्याच्या अगोदर उरकुडे होते, याच्या अगोदर लाडे येथे बसत होते ते पी.ए. आहे ते ऑफीस मध्ये बसतात त्यांना काही दिवस पालकमंत्री कडे पाठविले होते, पगार आमची महानगरपालिका देत होती. उरकुडे रिटायर्ड झाले ते आले स्वच्छता भारत अभियान 138 व्या नंबर वर नागपूर शहर आले त्यांना रिटायरमेंट झाल्यानंतर घेतले. आम्ही हजारे साहेबांना सुध्दा पाठविले होते. आपल्याकडे अधिकृत पी.ए. असतांना आपण त्याची सेवा घेत नाही त्यांची पण सेवा घ्यायला पाहिजे.

महापौर :— यांच्या अपॉइमेंट 6/6 महिन्याच्या आहेत. आपल्याकडे आकृतीबंध लवकरच मंजुर होणार आहे.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, आपली फर्म जी आहे ती खाजगी फर्म आहे काय? नगरसेवक असेच नियुक्त करणार आहेत काय? सेंट्रल गव्हर्नमेंटचे सर्कुलर आणि स्टेट गव्हर्नमेंटचे सर्कुलर आहे काय जेव्हा सेवानिवृत्त झालेले आहे 58 वर्ष 60 वर्षाचे आहे ते बेकाम झाले आहे त्यांना अनुभव आहे सेवा करायची इच्छा असेल तर फ्रि मध्ये करायला पाहिजे. जे तरुण आहे त्यांचे रक्त सळसळते आणि ते चांगले काम करतात.

महापौर :— मा. सत्तापक्ष नेते यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**<u>प्रश्न क्र 51</u>** :— नागपूर महानगरपालिके अंतर्गत कार्यरत असलेले विद्युत लाईनमन यांना केवळ दिवसापाळीत काम करण्याची अनुंमती आहे का? संदर्भात

श्री. प्रमोद हरीभाऊ तभाने :— मा.महापौरजी, या नागपूर शहरामध्ये 10 झोन आहे एका प्रभागात जवळपास एका झोनमध्ये जवळपास 10,500 लाईट आहे तर मा.महापौरजी तेथे एक चेकर असतो आणि 1 लाईनमन असतो आणि त्यांचा टाईम जो आहे तो सकाळी 10 ते 5 मध्ये काम करतो आणि जे लाईट असतात ते रात्री सुरु करतात परंतु रात्री जे लाईट असतात यामध्ये मा.महापौरजी मी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये असे आहे की नागपूर

महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेले जे विद्युत लाईनमन त्यांना केवळ दिवसापाळीत काम करण्याची अनुमती आहे काय? मा.महापौरजी मला उत्तर देण्यात आले की नागपूर महानगरपालिके अंतर्गत विद्युत लाईनमन या पदावर कार्यरत कर्मचारी सद्या विद्युत देखभालीचे काम करीत आहे. मला नगरसेवक म्हणुन जवळपास 9 महिने झालेले आहे. या 9 महिन्यात जे काम करणारे लाईनमन आहे त्यांच्या संदर्भात माहिती दयावी.

महापौर :– प्रशासनाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता विद्युत (श्री.जयस्वाल) :– मा.महापौरजी, लाईनमनचे पद आहे त्यापदावरील कर्मचारी हे फक्त देखभाल व दुरुस्तीचे काम करतात आपण जे स्ट्रीट लाईन मेंटेनन्स संदर्भात बोलत आहे ते कॉट्रॅक्टरचे लोक असतात आपण हा लाईनमन संबंधी प्रश्न विचारला आहे मी त्या प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे.

श्री.प्रमोद हरीभाऊ तभाने :– मा.महापौरजी, खुप सारे प्रभाग असे आहे की त्या प्रभागामध्ये लाईनमन आहेतच नाही.

कार्यकारी अभियंता विद्युत (श्री.जयस्वाल) :– मा.महापौरजी, लाईनमन हे पद आपल्या आस्थापनेवर आहे. ते जे लोक आहे त्यांच्याकडे फक्त इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीचेच काम आहे. लाईनमन आणि वायरमन किंवा जे वॉटर पंपाची दुरुस्ती करतात ते लोक स्ट्रीटलाईट मेंटेनन्स करीता काम करीत नाही.

श्री.प्रमोद हरीभाऊ तभाने :– मा.महापौरजी, नागपूर शहरात जे स्ट्रीट लाईट आहे त्याची व्यवस्था कोण पाहते.

कार्यकारी अभियंता विद्युत (श्री.जयस्वाल) :– मा.महापौरजी, नागपूर शहरातील स्ट्रीट लाईट आहे त्याच्या करीता आपण कॉट्रॅक्टर नेमलेले आहे त्यांची माणसे काम करतात.

श्री.प्रमोद हरीभाऊ तभाने :– मा.महापौरजी, ते केव्हा काम करतात

कार्यकारी अभियंता विद्युत (श्री.जयस्वाल) :– मा.महापौरजी, जेथे कॉट्रॅक्टरचे माणसे असतील तेथे आपले चेकर आणि लाईनमन दुरुस्तीचे काम करीत नाही आणि संध्याकाळच्या वेळेला आपण प्रत्येक दिवा दुरुस्त करु शकत नाही जर सर्कीट काही बंद असतील तर सर्कीट रिपेरिंगचे काम आपण त्यांच्याकडुन करुन घेतो.

महापौर :– प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे आता विषयपत्रिकेला सुरुवात करु.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, विषयपत्रिकेला सुरुवात करण्याआधी माझा औचित्याचा मुद्दा असा आहे जेव्हा आपण प्रश्नोत्तराचा तास घेतो त्याच्यामध्ये आपण रुलिंग देता त्या रुलिंगचे त्याच्यानंतर काय होते त्याचा प्रश्न आहे. दि. 15/09/2017 च्या बैठकीमध्ये मा.महापौरजी, आपण एक असे रुलिंग दिले होते की सदस्यांच्या भावना लक्षात घेता मा.आयुक्तांनी त्याची पाहणी करुन अहवाल सादर करावा व त्या बाबतचे धोरण ठरवावे. मुळ प्रश्न जो होता तो सन्माननिय सदस्य श्री.पुरुषोत्तम हजारे यांचा होता पार्डी येथील मार्केटच्या संदर्भातील प्रश्न होता त्यामध्ये आपण असे रुलिंग दिले होते त्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली हा माझा प्रश्न आहे. दुसरे आपले रुलिंग होते प्रश्न क्र 36 च्या अनुषंगाने मा.महापौरजी म्हणतात आरोग्य अधिकाऱ्यांची जागा प्रशासनाने त्वरीत भरावी व आरोग्य विभागाला न्याय दयावा मा.सदस्य श्री.जमाल यांनी सफाई कर्मचाऱ्याच्या बाबतीत जो प्रश्न विचारला तो अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे त्याची चौकशी करुन 15 दिवसाच्या आंत अहवाल सादर करावा. मा.महापौरजी या आदेशाचे प्रशासनातर्फे काय पालन करण्यात आले त्याची पण माहिती सभागृहाला देण्यात यावी. तिसरा प्रश्न जो आहे ठराव क्र.102 यामध्ये मा.महापौरजी यांचे रुलिंग आहे प्रविण दटके, तानाजी वनवे, धर्मपाल मेश्राम इत्यादी मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता आरोग्य समितीने 1 महिन्याच्या आत त्याचे धोरण ठरवावे आणि सभागृहा समोर आणावे. हे चौथे रुलिंग आहे असे एका सभेमध्ये दिलेले रुलिंग आहे या रुलिंगच्या संदर्भामध्ये प्रशासनाने काय काय कारवाई केली, आपल्या दिशा निर्देशाचे पालन झाले काय याची माहिती प्रशासनाने या सभागृहाला दयावी अशी मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने विनंती करतो.

महापौर :– प्रशासनाने माहिती दयावी.

निगम सचिव :– मा.महापौरजी, दि. 16/09/2017 रोजी या सदनामध्ये सर्वसाधारण सभेमध्ये आपण दिलेले निर्देश आम्ही त्याचे अनुपालन करण्याकरिता संबंधित विभागाला प्रेषित करण्यात आलेले आहे परंतु या विभागा कडुन अनुपालन अहवाल आज पर्यत प्राप्त झालेला नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, 15 दिवसाच्या आत, 1 महिन्याच्या आत, लवकरात लवकर धोरण निश्चित करावे, सभागृहाच्या भावना जाणुन घेत आपण प्रशासनाला आपण तसे आदेश देता मा.महापौरजी, प्रशासनाने संबंधित विभागाकडे पाठविले पण महानगरपालिकेमध्ये सन्माननिय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्या प्रश्नांच्या संदर्भामध्ये मा.महापौरांकडुन रुलिंग घेणे प्रत्येक सदस्य काम असते आणि आणि ते मा.महापौरजी यांच्याकडुन रुलिंग

घेत असतो आणि रुलिंग झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी जर होत नसेल तर मा.महापौरजी या सर्वभौम सभागृहाला जे अधिकार आहे त्या अधिकाराची अंमलबजावणी जर होणार नसेल तर आपण हे सर्वच्या सर्व प्रश्न जर विशेष समित्यांकडे जर पाठविणार असु तर त्याला तर केराची टोपली दाखविणार, जर आपण दिलेल्या रुलिंगचे जर प्रशासनाकडुन अंमलबजावणी होत नसेल तर मा.महापौरजी आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. आपण सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन रुलिंग देता 15 दिवसाच्या आत धोरण निश्चित करावे, येथे सन्माननिय दटके साहेबांनी अत्यंत चांगला मुद्या उपस्थित केला होता रुग्णालयाच्या संदर्भात धोरण निश्चित करण्यासंदर्भात का धोरण निश्चित झाले नाही.

महापौर :— आयुक्तांनी या प्रश्नाचे उत्तर दयावे की महापौरांच्या रुलिंग वर प्रशासनाने काय अंमलबजावणी केली.

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, आपण दिलेले रुलिंग आम्ही संबंधित विभागाकडे पाठविलेले आहे त्याची माहिती मी घेतो आणि महापौरांनी जे रुलिंग देण्यात आले आहे त्याच्यावर काय कार्यवाही करण्यात आलेली आहे याचे सविस्तर अहवाल 7 दिवसाच्या आत आपणांस देतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, सन्माननिय महापौरांच्या रुलिंगचे अंमलबजावणी करण्यासाठी विधीमंडळाच्या धर्तीवर आश्वासन समिती राहते. आपण जे या सभागृहामध्ये प्रशासनाच्या वतीने किंवा जनतेच्या माध्यमातुन जे आश्वासन देतात ते कमीटमेंट आहे ते या सभागृहाला नाही तर ते या शहरातील जनतेसोबत केलेले कमीटमेंट आहे आणि त्याच्यावर अनुपालन करीत असतांना प्रशासनाला जर अडचण होत असेल तर त्या प्रशासनीक अडचणी या सभागृहाच्या निर्देशनास या प्रशासकीय बाबी समोर आणल्या पाहिजे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, माझा मुद्या असा आहे की प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी अत्यंत महत्वाचा मुद्या या सभागृहासमोर आणला जे सन्माननिय सदस्य आपल्या भावना सभागृहामध्ये व्यक्त करतात आणि आपण रुलिंग दिल्यानंतर त्याच्यावर कुठलिही कार्यवाही 15 दिवसाच्या आतमध्ये किंवा महिन्याभरात होत नाही जसे विधान सभेमध्ये आश्वासन समिती आहे की, दिलेल्या आश्वासनाची पुर्ती होते किंवा नाही हे बघण्यासाठी आपण या सभागृहाची समिती तयार करावी आणि त्यांच्या देखरेखीखाली की महापौरांनी दिलेले आश्वासनाची पुर्तता होते की नाही हे आपण त्वरीत या संबंधीचे आदेश कार्यालयाला दयावे आपण रुलिंग दयावे मा.महापौरजी अशी मी विनंती करतो.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी मा.सत्तापक्ष नेत्यांच्या अध्यक्षतेखाली ती समिती करावी जेणेकरुन त्या समितीमध्ये सर्वपक्षांचे सदस्य त्या समितीमध्ये येईल आणि ही समिती आपले सभागृह संपल्यावर 10 दिवसांनी, 5 दिवसांनी बसुन काय झाले काय नाही झाले याची तपासणी करेल आणि मा.सदस्य श्री.प्रफुल्लजी यांचा मुद्या योग्य आहे. परवाच मी मा.आयुक्तांशी बोललो दोन मोठे विषय होते, त्यातील एक विषय होता पार्कीगच्या संदर्भाचा की जे फ्लॅट आणि मॉल यामध्ये ज्या पार्किंगच्या ॲमिनीटीज आहे त्याच्यावर आपण कर लावतो काय त्यांनी मला सांगितला की आता आपण त्यावर कर लावला. दुसरा विषय एम.आर.टी.पी. ॲक्टचा होता आणि जसे नाशिक महानगरपालिकेला नाशिक महानगरपालिका ॲक्ट आहे. जर तेथे जर ऑब्जेक्शन घ्यायचे असेल एखादयाला बांधकामाच्या नोटीसवर आपल्याला कोणासमोर जायचे असेल तर त्याच महानगरपालिकेत एक अधिकारी डेसीगनेट आहे, त्याच्याकडे जावे लागते. आपल्याला मुंबईमध्ये जावे लागते आणि मग मोठया प्रमाणावर इललीगल बांधकामाला शह मिळतो आणि मग अशा विषयावर आपण समिती तयार केली तर निश्चित आपला फायदा होईल आपण मा. सत्तापक्ष नेत्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमावी, ही नम्र विनंती.

महापौर :— मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आश्वासन समिती नेमतील.

प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, आश्वासन पुर्तता समिती स्थापन करावी.

महापौर :— आश्वासन पुर्तता समिती नेमण्यात येईल आणि आयुक्तांनी 15 दिवसाच्या आत त्या रुलिंगवर काय अंमलबजावणी केली त्याची सुध्दा पुर्तता करावी.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, या अहवालामध्ये समित्यांचे अहवालांचे कार्यवृत्त कायम करायचे आहे येथे नं. 2 वर वैद्यकीय सेवा व आरोग्य समितीचा अहवाल आहे. यात आपण जे काही नविन बायलॉज तयार करण्याकरिता दिलेले आहे त्याचा अहवाल आहे त्या संदर्भात सुचना आलेल्या आहे त्या अनुषंगाने हा अहवाल कायम करावा अशी सुचना मी आपणांस करतो.

**<u>ठराव कमांक137</u>:—** वरील चर्चेनंतर सभागृहातील मा.सदस्यांचा मानस लक्षात घेता मा.सदस्यांनी सभागृहात

उपस्थित केलेल्या चर्चेच्या आणि प्रश्न स्वरूपात विचारलेल्या माहितीच्या अनुषंगाने मा.महापौरजी यांनी संबंधित विषयाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशाची प्रशासनामार्फत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून अनुपालन पुर्तता समिती मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे अधिकार मा.महापौरजी यांना प्रदान करण्यात येतात. या मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी केलेल्या सुचनेसह समिती गठीत करण्यात येईल. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1. .श्री. संदीप जोशी अध्यक्ष
2. श्रीमती हर्षला साबळे सदस्य
3. श्रीमती दिव्या धुरडे सदस्य
4. श्री.संजय बुर्रेवार सदस्य
5. .श्री.महेंद्र धनविजय सदस्य
6. श्रीमती मंगला गवरे सदस्य

<u>ठराव कमांक 138 </u>:— नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. सर्व साधारण सभा दिनांक 15.09.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 15.09.2017 दुपारी 12.30 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. सर्व साधारण सभा दिनांक 16.10.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 16.10.2017 दुपारी 12.05 वाजता चे कार्यवृत्त
5. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 16.10.2017 दुपारी 12.30 वाजता चे कार्यवृत्त
6. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 16.10.2017 दुपारी 12.55 वाजता चे कार्यवृत्त

<u>ठराव कमांक 139 </u>:— नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्याच्या प्रश्नाची सभागृहाने नोंद घेतली.

1. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 23—06—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता
2. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 07—07—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता
3. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 21—07—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता
4. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 04—08—2017** रोजी **दुपारी 12—00** वाजता
5. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 10—08—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता
6. म.न.पा. स्थायी समिती सभा **दिनांक 23—08—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता
7. म.न.पा. स्थायी समिती विशेष सभा **दिनांक 29—08—2017** रोजी **दुपारी 03—00** वाजता

<u>ठराव कमांक 140 </u>:— नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा

1. स्थापत्य विद्युत व प्रकल्प विशेष समिती.
   1. शुक्रवार दिनांक दि. 07.07.2017 सकाळी 12.30 वाजता चे कार्यवृत्त
2. वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
   1. बुधवार दि. 13.09.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
   2. गुरुवार दि. 12.10.2017 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्त
3. गलिच्छ वस्ती निर्मुलन घर बोधणी विशेष समिती
   1. मंगळवार दि. 26.09.2017 दुपारी 12.00 वाजता चे कार्यवृत्त
4. क्रिडा विशेष समिती
   1. मंगळवार दि. 17.10.2017 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त
5. महिला बाल कल्याण विशेष समिती
   1. शुक्रवार दि. 27.10.2017 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

प्रश्न सभागृहाने विचारात घेवून वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या दिनांक गुरुवार दि. 12.10.2017

दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत्तात बाहय रूग्ण व्यावसायिक धोरणाच्या संदर्भात सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके आणि श्री.संजय चावरे यांनी सभागृहात लेखी स्वरूपात खालील सुचविलेल्या दुरूस्तीसह तसेच मा.सत्तापक्ष नेते यांनी या विषयासंदर्भात अनेक सुधारणा करावयाच्या असल्यामुळे धोरणात्मक निर्णयाकरीता सभागृहापुढे पाठविण्यात यावा या सुचनेसह हे कार्यवृत्त कायम करण्यात यावे या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

आरोग्य विभागाने तयार केलेल्या प्रस्तावित बाहयरूग्ण व्यावसायिक धोरण
यात काही सुधारणा सूचविण्याबाबत

आरोग्य विभागातर्फे सद्यस्थितीत बाहयरूग्ण व्यवसाय(ओपीडी क्लिनिक) च्या नामांकनासाठी वापरण्यात येणारे निकष कायम ठेवण्याची भुमिका घेण्यात आली. वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या बैठकीत आरोग्य विभागातर्फे हे प्रस्तावित धोरण मांडण्यात आले. यात पुर्व निकषात काही बदल करून सोबत जोडलेल्या मुद्यांचा विचार करण्यात यावा. सूचविलेल्या बाबींचा धोरणात अंतर्भाव केल्यास शहरातील हजारो निवासी गाळयात वास्तव्यास असलेल्या नागपूरकरांना त्याच्या निवासी गाळयात सुरू असलेल्या बाहरूग्ण वैद्यकीय सेवेपासुन होणारा त्रास दूर होईल. नागरिकांना वेठीस धरून शहरातील अनेक निवासी गाळयात अशा वैद्यकीय केंद्राना मनपाच्या आरोग्य विभागाने अत्यंत कमी शुल्कात परवाना व नामांकन दिले आहे. असे केंद्र सरसकट बंद करावेत. अशा केंद्राना शहरातील कुठल्याही भागातील इमारतीतील व्यावसायिक गाळयांमध्ये बाहय रूग्ण सेवा करण्याची परवाना व नामांकन द्यावे, ही विनंती.खालील सूचविलेल्या बाबी या आरोग्य विभागाने तयार केलेल्या प्रस्तावित धोरणातील बाबींशी संबंधित आहे. त्यात काही अल्प सुधारणा व्हाव्यात ही अपेक्षा.

1) आरोग्य विभागाने नमुद केल्याप्रमाणे संपूर्ण रहिवाशी सदनिका(रेसीडेंशीयल फ्लॅट स्किम) मध्ये वैद्यकीय व्यवसायाचे नामांकन अनुज्ञेय नसावे.

'यात अशा इमारतीच्या आतील भागातील निवासी गाळयांमध्ये असे केंद्र नसावेत, अशी सुधारणा करावी.'

2)ओपीडी व्यवसायिक जागा वाणिज्यीक स्वरूपाची असावी, असे म्हटले आहे.

'यात ती इमारतीच्या बाहय भागात व स्वतंत्र बाहय पार्किंग बघूनच नमुद असावी.'

अ) व्यवसायिक जागेचे क्षेत्रफळ किमान 100 चौ.फूट असावे. यात रूग्ण व त्यांचे नातेवाईक आत बसू शकतील अशी व्यवस्था असावी.

ब)लोखंडी शटर असलेल्या व्यवसायिक जागेचा प्रवेश मुख्य मार्गावरून किंवा त्यांच्या उपमार्गावरून थेट असावा. नामनिर्देशीत नावाच्या फलकात शैक्षणिक अर्हता व दवाखान्याची वेळ स्पष्ट नमूद करणे अनिवार्य असावे, असे म्हटले आहे. 'यात लोखंडी शटर असलेली व्यावसायिक जागा ही इमारतीच्या बाहय भागातीलच असावी. त्यासाठी मुख्य प्रवेशद्वार व उपमार्गाचा प्रवेशाचा प्रश्न येणार नाही' त्यामुळे यात स्पष्टता होणे आवश्यक आहे. शिवाय नियमानुसार संबंधित वैद्यकीय व्यवसाय करणा—यास नावाच्या फलकात शैक्षणिक अर्हता, मनपा नोंदणीक्रमांक व कालावधी, दवाखान्याची वेळ स्पष्ट असणे बंधनकारक करावे.

3)रहिवाशी सदनिकेत संबंधित जागेचा नकाशा वाणिज्यीक वापरासाठीही मंजुरी धारण करीत असल्यास, अशा जागेत ओपीडी व्यवसाय करण्यास किमान 70 टक्के गाळेधारकांची संमती घेणे बंधनकारक करावे, असे नमूद आहे.

'यात रहिवासी सदनिकेच्या बाहय भाग हा वाणिज्यीक वापरासाठीही मंजुरी धारण करीत असल्यास अशाच बाहय व्यावसायिक गाळयात ओपीडीला मंजुरी अनुज्ञेय असेल. मात्र, यासाठी त्या इमारतीतील 70 टक्के ही अट काढून सरसकट गाळेधारकांची संमती घेणे आवश्यक आहे. कारण अनेकदा परवानगी एका केंद्रासाठी असते प्रत्यक्षात मात्र तेथे एक्स रे, सोनोग्राफी व सिटी स्कॅनसारखे व्यवसायही सुरू केले जातात. ही खबरदारी घेतली जावी.'

4)धार्मिक अथवा सामाजिक समुदायाच्या जागेत धर्मार्थ वैद्यकीय सेवेकरीता बाजूच्या रहिवाशांची संमती बंधनकारक नसावी, असे नमुद आहे.

हे मान्य असले तरी यामुळे किमान शेजारी राहणा—या नागरिकांना अशा केंद्रामुळे त्रास, अडचण व कुठलीही समस्या भविष्यात निर्माण होवू नये, याकडे गंभीरतेने लक्ष दिले जावे.

5)बाहय रूग्ण व्यवसायीक संरचना विचारात घेऊन नामांकन शुल्क वसुलीबाबतही प्रस्तावित धोरणात शुल्क नमुद आहे. आरोग्य विभागाने आरोग्य समितीने 12 ऑक्टोबर, 2017 च्या सूचनेप्रमाणे बदल/सुधारणा करण्याचे जाहीर केले आहे.

या नमुद वाढीव शुल्कात हे शुल्क किती वर्षासाठी आकारणार, हे नमुद नाही. तसेच समितीने सूचविलेले शुल्कही कमी आहे. त्या तुलनेत संबंधित व्यवसाय करणारे मोठया प्रमाणात रूग्णांकडून शुल्क आकारतात, अशी ओरड आहे. ती लक्षात घेता मनपाकडून त्यांना परवाना, नामांकन व इतर सुविधा देतांना खर्च पडतो. हा खर्च बघता यात आणखी वाढ करावी, अशी माझी सुचना आहे.

असे असावे धोरण

1) शहरातील कुठल्याही निवासी गाळयांमध्ये कुठल्याही प्रकारचे बाहय रूग्ण व्यवसाय चालविण्यावर प्रतिबंध असावा

2) एमआरटीपी कायद्यात त्या सुधारणा कराव्यात. अशा व्यवसायासाठी दिलेल्या नोटीसनंतर संबंधित व्यवसाय बंद करण्याचे अधिकार मनपाला असेल.

3) नियमबाहय वा तक्रारीअंती नोटीसमध्ये कारवाई होत असेल तर मनपाला असे केंद्र बंद करण्याचे अधिकार असतील.

4) निवासी गाळयांच्या गैरवापर करणा–याविरूध्द कठोर कारवाई प्रस्तावित असेल. यात मोठा दंड आकारून त्याचे संबधीत गाळे जप्तीचे अधिकार मनपाला असेल.

5) निवासी गाळयाच्या बाहय भागातील व्यावसायिक गाळयांमध्ये पीसीपीएनडीटी कायद्यान्वये दिलेल्या परवानगीसाठी त्याच इमारतीत राहणा–यांची नाहरकत असावी. शिवाय, संबंधित व्यवसाय करणा–याची इमारतीच्या बाहेर त्यांची पार्किंगसाठी स्वतंत्र अशी व्यवस्था असावी.

6)सोनोग्राफी, फिजीओथेरेपी, एक्स रे, पॅथालॉजी वा इतर वैद्यकीय व्यवसायाला निवासी इमारतीच्या बाहेरच परवानगी असेल.

7)निवासी गाळयातील सर्व गाळेधारकांना परवानगीनंतरच इमारतीच्या बाहयभागातील गाळयात परवानगी असावी. कारण, अशा व्यवसायामुळे गाळेधारकांना रेडीएशन वा इतर प्रकारच्या किरणांचा त्रास होण्याची शक्यता अधिक असते.

8) मनपाने पीसीपीएनडीटी कायदा अधिक कठोर करावा. यानुसार तात्पुरत्या वा अस्थायी स्वरूपात झालेली नोंदणी व परवानगी रद्‌द करण्याचे अधिकार मनपाकडे अबाधित राहील.

9) सध्या शहरात अस्थायी स्वरूपात परवाना व नोंदणी दिलेल्या बाहयरूग्ण वैद्यकीय व्यवसायालाही हे धोरण लागू असेल.

10) तक्रार आल्यानंतर जिल्हा वा राज्य पीसीपीएनटीडी कमिटीकडे न्याय मागण्यासाठी जाण्याऐवजी परवानगी देणा–या कमिटीनेच त्यावर निर्णय घ्यावा.

11) निवासी गाळेधारकासोबत व्यवसाय करणा–यालाही दाद मागण्याचा अधिकार असावा. मात्र, यात गाळेधारकांना होणारा त्रास सर्वोच्च मानूनच त्यासंबंधीचे निर्णय घेतले जावेत.

12) शहरातील कुठल्याही निवासी गाळयांमध्ये यानंतर वा सध्या सुरू असलेले सर्व बाहयरूग्ण व्यवसाय केंद्राची तपासणी करावी. यात प्रस्तावित नव्या धोरणानुसार नियम वा अटी तसेच शर्तीचे उल्लंघन असेल तर ते तातडीने बंद करण्यात यावे.

13) अपार्टमेंट वा निवासी गाळे बनविणा–या बिल्डर्सला असा व्यवसाय करण्यासाठी गाळे विक्री करता येणार नाही, असे बंधन घालण्यात यावे. यासाठी नकाशा मंजुरी करतानाच नगररचना विभागाकडून अट घातली जावी. आरोग्य विभागानेही केंद्रांना मंजुरी देताना याप्रकारचे नाहरकत प्रमाणपत्र व हमीचे पत्र देणे बंधनकारक करावे.

14) बाहय व्यवसायासाठी निवासी गाळयाच्या बाहेर भागात व्यावसायिक स्वरूपाचे गाळे असेल तरच अशा केंद्राच्या परवानगीवर विचार व्हावा. मात्र, त्यासाठीही त्या निवासी इमारतीतील रहिवाशांची सरसकट परवानगी बंधनकारक करावी. इमारतीच्या आत अशा व्यवसाय करणा–यास परवानगी नसेल. पार्किंग वा इतर सुविधाही देण्यावर प्रतिबंध असावा.

15) शहरात निवासी गाळयांमध्ये सध्या सुरू असलेल्या सर्व बाहय रूग्ण व्यवसायाची तपासणी करण्यात यावी. काही तक्रारी असल्यास असे केंद्र बंद करण्याची कारवाई सुरू करावी.

16) शहरात निवासी गाळयात सुरू असलेले सर्व केंद्र बंद करण्याची कारवाई करतानाच, त्यांच्यावर गाळयांमध्ये विनापरवानगी स्ट्रक्चरल बदल वा दुरूस्ती केली असल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

17) निवासी गाळयांव्यतिरिक्त बाहय भागात वा इतर इमारतीमध्ये स्वतंत्र व्यवसाय करणा–यांना मनपाने दिलेल्या परवानगीनुसार तपासणी पथकाकडून नियमित तपासणी करण्यात येईल. प्रत्येक तीन महिन्यात तपासणी करून

त्यांच्याकडून हमीपत्र घेण्यात यावे.

18) हमीपत्राचे उल्लंघन करण्यात आल्याचे प्रकार उघडकीस आल्यास तातडीने परवानगी व नोंदणी रद्द करण्याचे अधिकारही मनपाला असेल.

19) प्रत्येक तीन महिन्यासोबत आकस्मिक तपासणीचे अधिकारही मनपाला असेल. त्यावर कुणालाही आक्षेप घेता येणार नाही.

20) शहरातील प्रत्येक निवासी गाळयांमधील रहिवाशांच्या जीवीतांचे रक्षण, जगण्याचा अधिकार वा त्यांचे स्वातंत्र्य याचे अधिकार जतन करण्याचे कर्तव्य आहे. त्यानुसार, मनपाचे शहराच्या हितासाठीचे हे धोरण असेल.

21) प्रस्तावित नवे धोरण हे शहरात सध्या निवासी इमारतीत वा अशा इमारतीबाहेर व्यावसायीक गाळयांमध्ये सुरू असलेल्या बाहय रूग्ण वैद्यकीय सेवेला लागू असेल. या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. उल्लंघन आढळल्यास फौजदारी वा दंडात्मक कारवाईचीही तरतूद असावी.

22) या सर्व अटी, नियम, निकषांचे पालन करावे. काही तांत्रिक वा इतर अडचणी आल्यास आयुक्तांना अंतिम निर्णयाचा अधिकार असेल.

महापौरः— विषय पत्रिकेला आता आपण सुरुवात करुया

**<u>ठराव कमांक 141 :—</u>** नागपूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेत मौजा— अंबाझरी येथील खसरा क्र. 62(P), 65(P), 66(P), 68(P) अंतर्गत दर्शविलेल्या विद्यमान खुल्या जागेपैकी 2700.00 चौ.मी. जागेचा विद्यमान खुली जागा म्हणून दर्शविलेला वापरात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये जागेच्या वापरात फेरबदल करुन ही जागा निवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे तरतुदीनुसार नागपूर शहराकरिता सुधारित विकास योजना, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. TPS - 2496 - 2643 - CR - 300 (A) - 97 - UD - 9 दि. 07.01.2000 व क्र. TPS - 2400 - 1628 - CR - 200 - 2000 - UD - 9 दि. 10.09.2001 नुसार मंजूर करण्यात आलेली आहे व उक्त विकास योजना अनुक्रमे दि. 01.03.2000 व दि. 21.09.2001 पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे, नगरविकास विभागाची अधिसुचना क्र. TPS - 2401/855/CR-76/ UD - 9 दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीतील सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरित क्षेत्राकरिता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेत मौजा—अंबाझरी येथील खसरा क्र. 62(P), 65(P), 66(P), 68 (P) अंतर्गत दर्शविलेल्या विद्यमान खुल्या जागेपैकी विकास योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे 2700.00 चौ.मी. जागेचा विद्यमान खुली जागा म्हणून दर्शविलेल्या वापरात फेरबदल करुन ही जागा निवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये कार्यवाही करणे तसेच सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करुन त्यावरील प्राप्त आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता मा. आयुक्त , महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 142 :—</u>** <u>विकास योजना — नागपूर</u>

मौजा — सिताबर्डी, नगर भुमापन क्र. 1696, शिट क्र. 44, सिव्हील लाईन, नागपूर आराजी 1488.10 चौ.मी.जागा W-52 या वाणिज्यीक प्रयोजनार्थ आरक्षणामधुन वगळुन उक्त जागा रहिवास जमीन वापरात समाविष्ठ करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

मौजा — सिताबर्डी, नगर भुमापन क्र. 1696, शिट क्र. 44, सिव्हील लाईन, नागपूर येथील श्री. नौशाद इ. भगवाघर यांनी प्रस्तावित बांधकामाचा नकाशा क्र. 185/सिताबर्डी/टीपी/मनपा/ प्रस्तावित नकाशा, दि. 20.12.2016 ला मनपाकडे मंजुरीस्तव सादर केला होता. उक्त प्रस्तावातील आखिवपत्रिकेनूसार 1488.10 चौ.मी. जागा नागपूर शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजना आराखडयानूसार W-52 या वाणिज्य प्रयोजनार्थ आरक्षणामध्ये अंतर्भुत असल्याने मा.

आयुक्त, यांनी दि. 25.04.2017 ला अस्तित्वातील मंजुर नकाशा असलेले 100 वर्ष जुने बांधकाम असल्याने मुळ Error समजुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अंतर्गत कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर आरक्षित वाणिज्य वापर भागशः बदलवून सदर जागा रहिवास प्रयोजनार्थ फेरबदल करण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे तरतुदीनुसार नागपूर शहराकरीता सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस – 2496 – 2643 – सी.आर. – 300 (ए) – 97 – युडी – 9, दि. 07.01.2000 व क्र. टीपीएस – 2400 – 1628 – सी आर –200 – 2000 –यु.डी.–9, दि. 10.09.2001 नुसार मंजुर करण्यांत आलेली आहे. व उक्त विकास योजना दि. 01.03.2000 व दि. 21.09.2001 पासुन अंमलात आलेली आहे. मंजुर सुधारीत विकास योजना आराखडयानूसार मौजा – सिताबर्डी, न.भु.क्र. 1696, शिट क्र. 44, आराजी 1488.10 चौ.मी. जागा ही जागा W-52 या वाणिज्यीक प्रयोजनार्थ आरक्षणामध्ये अंतर्भुत आहे.

नागपूर शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजना आराखडयानुसार मौजा – सिताबर्डी, येथील वाणिज्य प्रयोजनार्थ आरक्षित W-52 या आरक्षणाखालील जागेचे एकुण क्षेत्रफळ 1.3088 हेक्टर असून सदर आरक्षणाचे विकासासाठी नागपूर महानगरपालिका हे समुचित प्राधिकरण आहे. अर्जदार श्री. नौशाद इ. भगवाघर व ईतर यांनी दि. 08.03.2017 च्या पत्रान्वये सदर्हु आरक्षणाखालील जागेपैकी त्यांच्या मालकीचे 1488.10 चौ.मी. जागेचा विकास योजनेनुसार असलेला वाणिज्य वापर बदलवून निवासी प्रयोजनार्थ जमिन वापर प्रस्तावित करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्याची विनंती केलेली आहे. विषयांकित भुखंडावर अर्जदार यांचे तळमजला, पहिल्या मजल्याचे विद्यमान बांधकाम आहे. या जागेवरील बांधकाम नकाशास महानगरपालिका, नागपूरतर्फे दि. 20.09.1936 ला मंजुरी प्रदान आहे.

सबब सदर प्रस्तावातील फेरबदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर आरक्षणाखालील (W-52) वाणिज्य वापराकरीता दर्शविलेला जागेचा वापर बदलवून उक्त जागा निवासी जमीन वापर क्षेत्रात समाविष्ठ करणे यासाठी प्रस्ताव शासनाचे मंजुरीकरीता पाठविण्यांत येईल, यास्तव मनपा सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करणे करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव कमांक 143 :–</u>** दिनदयाल अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत (DAY-NULM) उपांग क्र. 6 शहरी बेघरांना निवारा या उपांगाअंतर्गत 4 शहरी बेघरांना निवारा नूतनीकरण करण्याचे उद्दिष्टे नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या मार्फत सन 2017–2018 ला प्राप्त झालेले आहे. त्याअनुषंगाने नाका क्र. 13 मागील समाज भवन नूतनीकरण करण्याबाबत प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नूतनीकरण करण्यात येणाऱ्या जागेचे नाव व पत्ता | निवाऱ्यात उपलब्ध करून देण्याऱ्या लाभार्थ्यांचा तपशिल | लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | नाका नं. 13 मागील समाज भवन, रेल्वे स्टेशन रोड, संत्रा मार्केट, नागपूर | पुरूष/ महिला | 100<br>50 |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे DAY-NULM अभियान अंतर्गत 1 शहरी बेघरांना निवारा 24 X 7 करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या परिसराचा विकास जवळपास दीड ते दोन करोड रुपये खर्च करुन केलेला आहे. हा परिसर रेल्वे स्टेशन जवळ असल्यामुळे या ठिकाणी यात्रेकरु करिता यात्री

निवास तयार करावा, जेणेकरुन यात्रेकरुला कमी खर्चात हे उपलब्ध होवु शकेल किंवा एकतर या ठिकाणी मंगल कार्यालय म्हणुन याचा उपयोग व्हावा जेणेकरुन म.न.पा. च्या आर्थिक उत्पन्नात भर पडु शकेल त्यामुळे कोणत्याही अनुत्पादक कार्याकरीता याचा उपयोग होता कामा नये. रात्रीनिवाऱ्या करीता म.न.पा. च्या बंद असलेल्या इमारती किंवा शाळेचा उपयोग व्हावा करीता हा विषय कार्यालयास परत करण्यात यावा या मा.सदस्य श्री.दयाशंकरजी तिवारी यांनी सादर केलेल्या लिखीत सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो या मा.महापौरजी, यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव कमांक 144:—** नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 अन्वये शासन अधिसुचना क्र. टिपीएस—2496/2643/प्र.क्र.300(अ)/97/नवि—9, दि. 07 जानेवारी 2000 तसेच अधिसूचना क्र. टिपीएस—2400—1628—सी.आर.—200—2000—यु.डी.—9, दि. 10 सप्टेंबर 2000 अन्वये मंजुर झाली असून नागपूर महानगरपालिका क्षेत्राकरीता विकास नियंत्रण नियमावली, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 अन्वये शासन अधिसुचना क्र. टिपीएस—2400—1684—प्र. क्र. 192—2000—नवि—9, दि. 31 मार्च, 2001 रोजी मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस —2401—855—सी.आर—76—यु.डी.—9, दि. 27 फेब्रवारी, 2002 अन्वये 7 योजनांकरीता नागपूर सुधार प्रन्यासला आणि उर्वरित क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावली—2000 मधील नियम क्र. N-2 मधील टेबल क्र. 28 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये खालीलप्रमाणे फेरबदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| EXISTING PROVISION IN DCR-2000 FOR NAGPUR CITY<br>TABLE No. 28<br>REAR/SIDE/MARGINS/TENEMENT DENSITES/HEIGHTS OF DIFFERENT CATEGORIES IN NON-CONGESTED RESIDENTIAL ZONES. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Description of Road | Min. Plot Size in sq.mt. | Min. Frontage in mts. | Min. setback from Road front in meters | Min. side and rear Open space in meters | Deleted Part | FSI | Tenement Density | Remark |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | National/State Highway or Roads as specified by the Municipal Commissioner /Chairman | 750 | 18 | 6 m. from D.P. road line. | As per regulation No. 15 subject to Min of 3 m. | | 1.00 | 250 tenements per Ha. | |
| 2 | M.D.R./O.D.R. and other roads 24 m. wide and above | 600 | 18 | 4.5 m. for purely residential tenements and 6 m. for other uses on ground floor | do | | 1.00 | do | |
| 3 | Roads of width below 24 m. wide and up to 15 m. | 500 | 15 | do | do | | 1.00 | do | |
| 4 | Roads of width below 15m and above 9 m. | 250 | 12 | 4.5 m. 6 m. for others users | do | | 1.00 | 250 tenements per Ha. | |
| 5 | Road of Width 6 m. to 9 m. | 250 | 12 | 3 m. | do | | 1.00 | do | |
| 6 | Road of width 12 m. and below | 125<br><br>250 | 8 to 12 | 3 m. | (i) 2.25 m. on one side in case of semi detached rear margin 3 m.<br>(ii) 3 m. from side and rear margin in case of detached plots. | | 1.00 | (i) G + 1<br><br>(ii) G + 2 | In case of categores 6.7 and 8 marginal distance of |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | any buldin g shall be min 3 m. from periph eral bound ary of the layout . |
| 7 | Row housing on roads of width 12 m. and below | 50<br>125 | 4 to 8 | 3 | side margin 2.25 rear margin 1.5 | | 1.00 | G + 1 | |
